cmyk

## संपादकीय

### गृहकर्जाची लाचारी!

स्वत:चे घर असावे, हे प्रत्येक कुटुंबाचे स्वप्न असते. या स्वप्नपूर्तीसाठी आज लाखो भारतीय गृहकर्जाचा आधार घेत आहेत. बँका आणि वित्तीय संस्था आकर्षक व्याजदर, जलद मंजुरी आणि २० ते ३० वर्षांच्या परतफेडीचा पर्याय देत असल्याने गृहकर्ज घेणे तुलनेने सोपे झाले आहे. मात्र घर खरेदी करताना बहुतेक नागरिक केवळ ''माझा ईएमआय किती असेल?'' या एका प्रश्नावर लक्ष केंद्रित करतात. प्रत्यक्षात गृहकर्जाचा खरा खर्च केवळ मासिक हप्त्यापुरता मर्यादित नसतो.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-९६ | शुक्रवार दि.२६ जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### व्हेनेझुएलात भूकंप ; १६४ जणांचा मृत्यू

व्हेनेझुएला : दक्षिण अमेरिकेतील व्हेनेझुएला या देशाला विनाशकारी भूकंपाचा धक्का बसला आहे. एका मिनिटाच्या अंतराने झालेल्या ७.२ आणि ७.५ तीव्रतेच्या भूकंपाच्या धक्क्यांमुळे प्रचंड विध्वंस झाला आहे. यात अनेक इमारती आणि घरे कोसळल्याचे वृत्त असून १६४ नागरिकांच्या मृत्यूची पुष्टी करण्यात आली आहे तर एक हजाराहून अधिक लोक जखमी असल्याचे सांगितले जात आहे. व्हेनेझुएलाची राजधानी काराकासच्या पश्चिमेला बुधवारी एक शक्तिशाली भूकंप झाला, ज्यामुळे इमारती कोसळल्या आणि लोक ढिगाऱ्याखाली गाडले गेले. यू.एस. जिओलॉजिकल सर्व्हेनुसार, काराकसच्या पश्चिमेला सुमारे १६० किलोमीटर (१०० मैल) अंतरावर ७.२ तीव्रतेचा पहिला भूकंप झाला आणि त्यानंतर एका मिनिटापेक्षा कमी वेळात ७.५ तीव्रतेचा दुसरा धक्का बसला. प्राथमिक अंदाजानुसार मृतांचा आकडा १०,००० ते १,००,००० च्या दरम्यान असू शकतो. देशातील मुख्य विमानतळाचे नुकसान झाल्याने ते बंद करण्यात आले. तसेच काराकसपासून सुमारे १,७०० किलोमीटर दूर असलेल्या ब्राझीलमधील ॲमेझॉन भागापर्यंतच्या इमारती रिकाम्या करण्यात आल्या आहेत.

### आणीबाणीच्या काळात लोकशाही चिरडली-मोदी

नवी दिल्ली : आणीबाणीचा कालखंड हा भारताच्या काळ्या अध्यायांपैकी एक होता, असा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी केला. या काळ्या कालखंडात लोकशाही निर्घृणपणे चिरडली गेली, असा आरोप देखील त्यांनी केला. आणीबाणी हा संविधानावर झालेला थेट हल्ला होता; कारण या काळात नागरी स्वातंत्र्यावर बाधा घालण्यात आली होती. अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंधने घालण्यात आली आणि भारतीय लोकशाहीचा आधारस्तंभ असलेल्या संस्थांवर प्रहार करण्यात आला, असे ते म्हणाले. आणीबाणी काळात लोकशाहीचे रक्षण करणाऱ्या सर्वांना पंतप्रधान मोदींनी श्रद्धांजली अर्पण केली. ते म्हणाले की, आणीबाणीने असंख्य नागरिकांचे धैर्य जगासमोर आणले; त्यांनी गप्प राहण्यास नकार दिला आणि संविधानातील आदर्शांचे जतन केले.

### डिजिटल अरेस्ट प्रकरणी १६ राज्यांत छापेमारी

नवी दिल्ली: सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळाशी मिळतेजुळते यूआरएल वापरून शेकडो लोकांना डिजिटल अरेस्ट प्रकरणाच्या जाळ्यात ओढणाऱ्या एका टोळीचे जाळे उद्ध्वस्त करण्यासाठी सीबीआयने १६ राज्यांमधील ८० ठिकाणी छापे टाकले. ऑपरेशन चक्र-६ अंतर्गत, सायबर फसवणुकीच्या २०० हून अधिक प्रकरणांशी संबंधित असलेल्या या टोळीचा पर्दाफाश करण्यासाठी सीबीआयने १६ राज्यांमध्ये ६० विशेष पथके तैनात केली होती. या राज्यांचा विस्तार पश्चिमेकडील पंजाब आणि गुजरातपासून ते ईशान्येकडील आसाम आणि मणिपूरपर्यंत होता. या प्रकरणाच्या केंद्रस्थानी एक संकेतस्थळ होते. हे संकेतस्थळ भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळाशी मिळतेजुळते आहे, असे सीबीआयने म्हटले आहे.फसवणूक करणाऱ्यांनी डिजिटल अरेस्टच्या नावाखाली पीडितांची फसवणूक करण्यासाठी या बनावट नोंदणीकृत डोमेनचा वापर केल्याचा आरोप आहे. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रीकडून मिळालेल्या तक्रारीच्या आधारे, सीबीआयने एफआयआर नोंदवून या प्रकरणाचा तपास सुरू केला होता.

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२५ जून २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३७.५० क्विंटल | २,००० | २,४३१ | २,३१८ |
| ज्वारी/हायब्रिड: २३.०० क्विंटल | २,३०१ | ३,००० | २,५८३ |
| मका/लोकल: ४.०० क्विंटल | १,८१० | २,०५० | १,९३० |
| तूर : १.०० क्विंटल | ७,१५० | ७,३०० | ७,२२५ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ६,५०१ | ६,५०१ | ६,५०१ |
| बाजरी: ३१.०० क्विंटल | २,४०० | २,७५२ | २,५८८ |
| मुग: ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन:१५.०० क्विंटल | ६,६५० | ६,६५० | ६,६५० |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,०१० | ५,०१० | ५,०१० |

# बळिराजाला दिलासा; राज्यात पुढचे दोन दिवस मुसळधार

मुंबई । प्रतिनिधी

**अनेक दिवसांपासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. मान्सूनने दमदार हजेरी लावत अक्षरश: झोडपून काढले. यामुळे शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. मान्सूनने जवळपास अर्ध्याहून अधिक महाराष्ट्र व्यापला आहे. उर्वरित ठिकाणी देखील पुढच्या चार दिवसांत शक्यता आहे.**



अंदाजानुसार सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, लातूर, धाराशिव, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये ५० किमी वेगाने वारे वाहणार असून, या जिल्ह्यांमध्ये अति मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच बुलडाणा, गोंदिया, नांदेड, परभणी आणि जालना या जिल्ह्यांमध्ये पावसाचा कोणताही अंदाज वर्तवण्यात आलेला नाही. तसेच मराठवाडा आणि विदर्भात हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस राहणार आहे. पश्चिम महाराष्ट्रात पुढच्या ४८ तासांत सर्वांत जास्त पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मान्सूनची ४२ टक्के कमतरता असल्यामुळे पुन्हा पावसाचा जोर कमी होऊ शकतो. ३० जूनपर्यंत मान्सून महाराष्ट्रातच राहणार आहे. मान्सूनची वाट पुन्हा संथ होण्याची शक्यता आहे. यावेळी पश्चिमी प्रशांत महासागरात वादळ तयार झाल्यामुळे मान्सूनसाठी पूरक असलेले वातावरण देखील बिघडले आहे. यामुळे आंध्र प्रदेश, बिहार, सिंध, अफगाणिस्तान आणि पाकिस्तानच्या आसपास सायक्लोनिक सर्क्युलेशन तयार झाले असून पश्चिम बंगालच्या खाडीत जर कमी दाबाचा पट्टा तयार झाला तर मान्सूनचे वारे पुढे सरकण्यासाठी मदत होते. मात्र सध्या अशी कुठलीही स्थिती तयार न झाल्याचे पाहायला मिळत आहे. मान्सूनमुळे पुढचे ४८ तास मुसळधार पाऊस होईल. त्यामुळे येत्या काळात पाच दिवस अजून मान्सूनच्या प्रवासासाठी वाट पाहावी लागणार असल्याची चिंता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. कोयना धरण पाणलोट क्षेत्रात गेल्या तीन दिवसांपासून पडत असलेल्या ▶▶ पान २ वर

# माझा भाऊ गिळला, आता मला आणि कुटुंबाला गिळणार का?-राहुल घुले

## मी वाघ म्हणणाऱ्या खा.सोनवणे यांचे नाव न घेता मयताच्या भावाचा सवाल

केज । प्रतिनिधी

**तालुक्यातील टाकळी येथील हॉटेल व्यवसायिक विलास घुले याची हत्या करण्यात आल्यानंतर जिल्हाच नव्हे तर राज्यभर संतापाची लाट उसळलेली असताना याच प्रकरणांमध्ये बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी कोणाचेही नाव न घेता मी बीडचा वाघ आहे, असे म्हटले होते. यावर प्रतिक्रिया देताना मयत विलास घुलेचे बंधू राहुल घुले यांनी माझा भाऊ गिळला गेला आता मला आणि माझ्या कुटुंबाला गिळा, असा संतप्त सवाल केला आहे.**



तालुक्यातील टाकळी येथील हॉटेल गावकरीचे मालक विलास घुले यांच्या झालेल्या भीषण हत्येप्रकरणी बीड जिल्ह्यात सध्या तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या हत्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यासाठी मृत विलास घुले यांच्या कुटुंबीयांना तब्बल चार दिवस पोलीस ठाण्यासमोर मृतदेह ठेवून आंदोलन करावे लागले होते. या घटनेने प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असतानाच, आता मृताच्या भावाच्या भावूक आणि तितक्याच आक्रमक प्रतिक्रियेने खळबळ उडाली आहे. काही दिवसांपूर्वी खासदार बजरंग सोनवणे यांनी एका प्रतिक्रियेदरम्यान ''मी बीडचा वाघ आहे'' असे विधान केले होते. या विधानाचा संदर्भ देत मृत विलास घुले यांचे भाऊ रमेश घुले यांनी अतिशय वेदनादायी प्रतिक्रिया दिली आहे. रमेश घुले यांनी अत्यंत भावूक होत विचारले की, ''काही दिवसांपूर्वी कुणीतरी मी वाघ आहे असे सांगितले. माझा भाऊ गेला, आता मला आणि माझ्या संपूर्ण परिवाराला गिळणार का?'' एका हसत्या-खेळत्या कुटुंबाचा आधार हिरावला गेल्याचे दु:ख व्यक्त करतानाच, त्यांनी राजकीय व्यक्तींच्या विधानांवरून उघड नाराजी आणि संताप व्यक्त केला आहे. ▶▶ पान २ वर

### पोलीस प्रशासनावर प्रश्नचिन्ह

गुन्हा दाखल करण्यासाठी चार दिवस मृतदेह घेऊन बसण्याची वेळ येणे, हे पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे आहे. आता मृताच्या कुटुंबीयांनी न्यायाची मागणी केली असून, या हत्या प्रकरणाचा तपास तातडीने होऊन आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## तुकाराम मुंढे यांचा संघर्षमय जीवनप्रवास आता पुस्तकरुपात

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

आपल्या धडाडीच्या, पारदर्शक आणि जनहितवादी प्रशासनशैलीमुळे राज्यभर आणि आता देशात परिचित असलेले २००५ बॅचचे आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या जीवनप्रवासावर आधारित पुस्तक लवकरच वाचकांच्या भेटीला येत आहे. एका कणखर प्रशासकाच्या खडतर आयुष्याचा आणि संघर्षमय वाटचालीचा वेध घेणारे हे पुस्तक सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. न्यू ईरा पब्लिकेशनतर्फे या पुस्तकाचे प्रकाशन होणार असून, ज्येष्ठ पत्रकार शफी पठाण यांनी हे पुस्तक लिहिले आहे. येत्या १७ जुलै रोजी या पुस्तकाचे प्रकाशन पुणे येथे होणार आहे.

सध्या अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त म्हणून कार्यरत असलेले तुकाराम मुंढे यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक महत्त्वाची प्रशासकीय पदे भूषवली आहेत. नागपूर महानगरपालिका आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त यासह विविध जबाबदारीच्या पदांवर काम करताना त्यांनी घेतलेल्या धाडसी निर्णयांमुळे आणि कठोर प्रशासनामुळे ते नेहमीच ▶▶ पान २ वर

## नसरापूर प्रकरणात आरोपी दोषी; शिक्षेकडे राज्याचे लक्ष

### मृत्यूदंड की जन्मठेप, २९ जूनला होणार फैसला

पुणे। प्रतिनिधी



**महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या नसरापूर येथील साडेतीन वर्षीय चिमुकलीच्या लैंगिक अत्याचार आणि खून प्रकरणाचा निकाल आज लागला आणि आरोपीला दोषी ठरविण्यात आले. मात्र न्यायालयाने आरोपीला शिक्षा २९ जूनला होणार असल्याचे जाहीर केले.**

याबाबत नसरापूरकरांनी आम्हाला न्यायदेवतेवर विश्वास असल्याचे भावना व्यक्त करत शांतता ठेवली आहे. मात्र पुढील अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी घटनास्थळावर पोलीस बंदोबस्त वाढवला आहे. आरोपी भीमराव प्रभाकर कांबळे (वय ६५) या वृद्ध नराधमाने खाऊचे अमिष दाखवून नसरापूर (ता. भोर) येथे एका साडेतीन वर्षीय मुलीवर अत्याचार करून तिचा खून केला होता. ही घटना (१ मे रोजी) घडली होती. या गुन्ह्याच्या प्रकरणी केवळ नसरापूरच नव्हे तर संपूर्ण राज्याचे लक्ष निकालाकडे पीडित कुटुंबासह संपूर्ण राज्याचे डोळे लागले होते. आरोपीला फाशीची शिक्षा होणार असल्याचा आत्मविश्वास बाळगून सर्वांच्या नजरा टीव्ही माध्यमावर दिवसभर खिळल्या होत्या. मात्र याप्रकरणी न्यायालयाने आरोपीला सोमवार २९ जूनला शिक्षा देणार असल्याचे ▶▶ पान २ वर

## मुद्रांक नोंदणी प्रकरणातील गैरव्यवहारांच्या चौकशीसाठी स्वतंत्र टास्क फोर्स-बावनकुळे

मुंबई । प्रतिनिधी



महसूल विभागातील मुद्रांक नोंदणी प्रक्रियेत झालेल्या कथित गैरव्यवहारांची राज्यस्तरीय चौकशी आता अकाउंटंट जनरल (एजी) कार्यालयामार्फत केली जाणार असून त्यासाठी स्वतंत्र टास्क फोर्स स्थापन करण्यात येईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिली. विधानसभा सदस्य जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना हा निर्णय जाहीर केला. यावेळी सदस्य नाना पटोले यांनीही उपप्रश्न उपस्थित केला.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यभर झालेल्या सर्व 'ॲडज्युडिकेशन' प्रकरणांची सखोल चौकशी एजीमार्फत करण्यात येणार आहे. केवळ चौकशीचे आदेश देऊन ▶▶ पान २ वर

## अवैध खनिज उत्खनन रोखण्यासाठी स्वतंत्र टास्क फोर्स

मुंबई । प्रतिनिधी

**अवैध गौण खनिज उत्खननाची शासनाने गंभीर दखल घेतली असून, अवैधरित्या गौण खनिजाचे उत्खनन रोखण्यासाठी, तसेच अशा प्रकरणांवर कठोर कारवाईसाठी स्वतंत्र टास्क फोर्सची स्थापना करण्यात येणार असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.**

सदस्य नाना पटोले यांनी या संदर्भात विधानसभेत प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य भास्कर जाधव यांनी सहभाग घेतला, त्यावेळी ते बोलत होते. बावनकुळे यांनी सांगितले की, गडचिरोली येथील साखर फाटा येथे घडलेल्या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यासाठी परवानगी मागण्यात आली होती. मात्र, त्यासाठी विलंब झाल्याने कारवाईला उशीर झाला. यापुढे अशा प्रकारचा विलंब होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. या प्रकरणी गडचिरोली जिल्हाधिकारी यांना संबंधित गुन्हेगारांवर एमपीडीएनुसार कारवाई करण्याबाबत ▶▶ पान २ वर

## ॲमेझॉनचे सीईओ अँडी जॅसी यांनी घेतली मोदींची भेट; भारतात करणार ४८ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक



दिल्ली । वृत्तसंस्था

अमेरिकेतील आघाडीची ई-कॉमर्स कंपनी ॲमेझॉनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अँडी जॅसी यांनी गुरूवारी (दि. २५) नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान, त्यांनी ॲमेझॉनतर्फे भारतात २०२६ ते २०३० या कालावधीत आपल्या व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी एकूण ४८ अब्ज डॉलर्सची (सुमारे ४ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त) गुंतवणूक करण्याची मोठी घोषणा केली.

जॅसी यांनी देशातील (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स) आणि क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चरच्या विस्तारासाठी २०३० पर्यंत अतिरिक्त १३ अब्ज डॉलर्सची ▶▶ पान २ वर

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

## ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ; ३६ हजार ५०० कोटी रुपयांची कर्जमुक्ती

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' लागू करण्याचा निर्णय घेतला असून या योजनेचा लाभ सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार आहे. सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांच्या या योजनेमुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार असल्याची माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी विधान परिषदेत दिली. नियम २६० प्रस्तावास उत्तर देताना ते बोलत होते.**



सहकार मंत्री पाटील म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त शेतकरी कल्याणाशी निगडित या महत्त्वपूर्ण योजनेस त्यांचे नाव देण्यात आले आहे. शेती, सिंचन, जलसंधारण आणि ग्रामीण विकासासाठी त्यांनी केलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे. शेतकऱ्यांवर वारंवार कर्जमाफीची वेळ का येते आणि त्यांच्या उत्पन्नात स्थैर्य कसे निर्माण करता येईल, याचा अभ्यास करण्यासाठी शासनाने माजी मुख्य सचिव प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समितीने अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना सुचवल्या असून त्यांची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतच्या अल्पमुदतीच्या पीक ▶▶ पान २ वर



## एकनाथ शिंदे यांची समज आणि दिलगिरीची सूचना

मुंबई । प्रतिनिधी

खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांना केलेली शिवीगाळ आणि त्यांना मारण्याची दिलेली धमकी यामुळे राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेसह शिंदेंच्या शिवसेनेतील नेत्यांनी यावर सारवासारव करत संजय पाटलांना समज देणार असल्याचे म्हणाले. ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# गृहकर्जाची लाचारी!

स्वतःचे घर असावे, हे प्रत्येक कुटुंबाचे स्वप्न असते. या स्वप्नपूर्तीसाठी आज लाखो भारतीय गृहकर्जाचा आधार घेत आहेत. बँका आणि वित्तीय संस्था आकर्षक व्याजदर, जलद मंजुरी आणि २० ते ३० वर्षांच्या परतफेडीचा पर्याय देत असल्याने गृहकर्ज घेणे तुलनेने सोपे झाले आहे. मात्र घर खरेदी करताना बहुतेक नागरिक केवळ ''माझा ईएमआय किती असेल?'' या एका प्रश्नावर लक्ष केंद्रित करतात. प्रत्यक्षात गृहकर्जाचा खरा खर्च केवळ मासिक हप्त्यापुरता मर्यादित नसतो. दीर्घकालीन व्याज, संधी खर्च, आर्थिक स्वातंत्र्य आणि भविष्यातील गुंतवणुकीवरील परिणाम यांचाही विचार करणे आवश्यक आहे.

भारतातील गृहकर्जाचे व्याजदर सध्या साधारणपणे ८ ते ९.५ टक्क्यांच्या दरम्यान आहेत. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीने ५० लाख रुपयांचे गृहकर्ज ८.५ टक्के वार्षिक व्याजदराने २० वर्षांसाठी घेतले, तर त्याचा मासिक ईएमआय सुमारे ४३,४०० रुपये येतो. पहिल्या दृष्टीक्षेपात हा हप्ता परवडण्यासारखा वाटू शकतो. मात्र २० वर्षांच्या कालावधीत या कर्जासाठी एकूण सुमारे १.०४ कोटी रुपये भरावे लागतात. यामध्ये मूळ कर्ज ५० लाख रुपये असताना केवळ व्याज म्हणून सुमारे ५४ लाख रुपये भरावे लागतात. म्हणजेच कर्जदार घराच्या मूळ किंमतीइतकीच अतिरिक्त रक्कम व्याजाच्या स्वरूपात भरतो. याहून मोठे उदाहरण पाहिले तर ७५ लाख रुपयांचे कर्ज २५ वर्षांसाठी ८.७५ टक्के व्याजदराने घेतल्यास मासिक ईएमआय सुमारे ६१ हजार रुपये येतो. मात्र संपूर्ण कालावधीत परतफेडीची रक्कम जवळपास १.८ कोटी रुपयांपर्यंत पोहोचू शकते. म्हणजेच कर्जदाराला मूळ कर्जाच्या दुपटीहून अधिक रक्कम परत करावी लागू शकते. त्यामुळे घर खरेदीचा निर्णय घेताना फक्त मालमत्तेची किंमत पाहून चालत नाही; तर एकूण परतफेडीचा खर्च समजून घेणे तितकेच महत्त्वाचे ठरते. गृहकर्जातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'अमॉर्टायझेशन'ची प्रक्रिया. अनेक कर्जदारांना वाटते की प्रत्येक ईएमआयमुळे मूळ कर्जाची रक्कम वेगाने कमी होत असेल. प्रत्यक्षात सुरुवातीच्या काही वर्षांत ईएमआयचा मोठा भाग व्याज भरण्यासाठी जातो. उदाहरणार्थ, ५० लाख रुपयांच्या कर्जाच्या पहिल्या ईएमआयमध्ये सुमारे ३५ हजार रुपये व्याजासाठी आणि केवळ ८ हजार रुपये मूळ रक्कम कमी करण्यासाठी वापरले जाऊ शकतात. त्यामुळे पाच वर्षे नियमित ईएमआय भरल्यानंतरही कर्जाची मोठी रक्कम बाकी राहते. यामुळे अनेक कर्जदारांना अपेक्षाभंगाचा सामना करावा लागतो. फ्लोटिंग व्याजदर हा गृहकर्जाचा आणखी एक महत्त्वाचा धोका आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने रेपो दरात वाढ केल्यास त्याचा परिणाम गृहकर्जाच्या व्याजदरांवर होतो. गेल्या काही वर्षांत रेपो दरातील वाढीमुळे लाखो कर्जदारांच्या ईएमआयमध्ये वाढ झाली किंवा कर्जाचा कालावधी वाढवण्यात आला. उदाहरणार्थ, ५० लाख रुपयांच्या कर्जावरील व्याजदर ८.५ टक्क्यांवरून ९.५ टक्क्यांपर्यंत वाढल्यास मासिक ईएमआयमध्ये हजारो रुपयांची वाढ होऊ शकते किंवा कर्जाचा कालावधी काही वर्षांनी वाढू शकतो. परिणामी एकूण व्याजाचा खर्च लाखो रुपयांनी वाढतो. गृहकर्जाचा सर्वात कमी चर्चिला जाणारा खर्च म्हणजे 'संधी खर्च'. समजा एखादी व्यक्ती दरमहा ४५ हजार रुपये ईएमआय भरत आहे. जर हीच रक्कम दीर्घकालीन इक्विटी म्युच्युअल फंडात सरासरी १२ टक्के वार्षिक परताव्याने २० वर्षे गुंतवली, तर ती रक्कम ४ कोटी रुपयांहून अधिक होऊ शकते. अर्थात घर आणि गुंतवणूक यांची थेट तुलना करता येत नसली, तरी गृहकर्जामुळे इतर आर्थिक संधींवर मर्यादा येतात, हे वास्तव नाकारता येत नाही. याशिवाय, मोठ्या ईएमआयमुळे कुटुंबाच्या आर्थिक लवचिकतेवर परिणाम होतो. मुलांचे उच्च शिक्षण, आरोग्यविषयक खर्च, निवृत्ती नियोजन, व्यवसायातील गुंतवणूक किंवा अचानक उद्भवणाऱ्या आर्थिक गरजांसाठी पुरेशी तरतूद करणे कठीण होऊ शकते. अनेक कुटुंबांमध्ये उत्पन्नाच्या ४० ते ५० टक्के रक्कम ईएमआयसाठी खर्च होते. वित्तीय तज्ज्ञांच्या मते, एकूण मासिक उत्पन्नाच्या ३० ते ३५ टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम गृहकर्जाच्या हप्त्यासाठी खर्च होऊ नये.

# चंद्रपूरच्या प्रदूषणावर ना. पंकजाताई मुंडे ॲक्शन मोडवर; विधानसभेतील लक्षवेधीत मांडली परखड भूमिका

## प्रदूषण नियंत्रणासाठीचा स्वतंत्र आराखडा पायलट प्रोजेक्ट म्हणून राबविणार; नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न माझ्यासाठी महत्वाचा

**मुंबई । प्रतिनिधी**

**चंद्रपूरसारख्या अतिप्रदूषित औद्योगिक क्षेत्रासाठी शॉर्ट टर्म, मिड टर्म आणि लाँग टर्म गोल्सचा स्वतंत्र आराखडा तयार करण्यात आला असून तो चंद्रपूरमध्ये पायलट प्रकल्प म्हणून राबविण्यात येणार आहे असे स्पष्ट करत हा आराखडा अंतिम करून सभागृहासमोर सादर करण्यात येईल, नागरिकांचे आरोग्य माझ्यासाठी महत्वाचे आहे असं राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज विधानसभेत परखडपणे सांगितलं.**

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूरमधील कोल वॉशरी, कोळसा खाणी, सिमेंट उद्योग आणि थर्मल पॉवर प्रकल्पांमुळे होणाऱ्या प्रदूषणाचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यास उत्तर देताना मंत्री मुंडे म्हणाल्या की, मी काही दिवसांपूर्वी चंद्रपूरचा दौरा केला.या दौऱ्यात मी स्वतः अनेक उद्योग, कोल वॉशरी आणि प्रभावित गावांना भेटी दिल्या. त्या भागातील प्रदूषणाची तीव्रता प्रत्यक्ष पाहिल्यावर असं लक्षात आलं की नागरिकांच्या आरोग्यावर याचा गंभीर परिणाम होत आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील वाढत्या औद्योगिक प्रदूषणाबाबत गंभीर भूमिका घेत पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी महामाया कोल वॉशरीला तात्काळ क्लोजर नोटीस जारी करण्याचे निर्देश दिले. प्रदूषणासंदर्भातील सुनावणीस संबंधित उद्योग हजर न राहिल्याने ही कारवाई करण्यात येत असल्याचे त्यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले. उद्योगामुळे प्रदूषणामुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानीबाबत जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती कार्यरत असून समितीने दिलेल्या आदेशांचे पालन उद्योगांनी करणे बंधनकारक असल्याचे मंत्री मुंडे म्हणाल्या. संबंधित उद्योगांनी बाधित शेतकऱ्यांना मदत करावी यासाठी प्रशासनाकडून पाठपुरावा केला जाईल, असेही त्यांनी नमूद केले. प्रदूषण नियंत्रणासाठी केवळ नोटीस देणे किंवा बँक गॅरंटी जप्त करणे पुरेसे नसल्याचे सांगत त्यांनी उद्योगांनाही या प्रक्रियेत सहभागी करून घेण्याची भूमिका मांडली. उद्योग बंद करणे हा उद्देश नसून रोजगार टिकवत प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक गुंतवणूक उद्योगांनीच करावी, असे आवाहन त्यांनी केले. थर्मल पॉवर प्रकल्पांचे प्रदूषणविषयक ऑडिट करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. फ्लाय ॲश व्यवस्थापन, वाहतूक व्यवस्था, रस्त्यांवरील कोळशाची धूळ आणि श्वसनविकारांना कारणीभूत ठरणाऱ्या बाबींवर कठोर उपाययोजना केल्या जातील. फ्ल्यू गॅस डिसल्फरायझेशन प्रणालीची अंमलबजावणी आवश्यक असलेल्या सर्व प्रकल्पांमध्ये करण्यावर भर दिला जाईल, असे त्यांनी सांगितले. बँक गॅरंटीची रक्कम वाढविण्याबाबत समिती स्थापन करण्यात येत असून त्यात लोकप्रतिनिधी, आयआयटी पवईचे तज्ज्ञ आणि प्रदूषणमुक्त तंत्रज्ञान वापरणारे उद्योजक यांचा समावेश केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय कोल वॉशरी व खाणींच्या परिसरातील बाधित जमिनी, हरित पट्टे निर्माण करणे, वनीकरण वाढविणे तसेच आवश्यक ठिकाणी गावांच्या पुनर्वसनाबाबतही महसूल, उद्योग व जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने धोरणात्मक निर्णय घेण्याची तयारी सुरू असल्याचे मंत्री मुंडे यांनी सांगितले. या लक्षवेधी दरम्यान विधानसभा सदस्य आदित्य ठाकरे, किशोर जोरगेवार, नाना पटोले, राजेश पवार, देवराव भोंगळे, भास्कर जाधव, ज्योती गायकवाड या सदस्यांनीही सहभाग घेतला.

# खाकी वर्दीला पुन्हा लाचेचा डाग!

## बीडमध्ये ८ हजारांची लाच घेणारा पोलीस कर्मचारी जाळ्यात

**बीड । प्रतिनिधी**

**समन्स बजावण्याच्या मोबदल्यात आठ हजार रुपयांची लाच स्वीकारताना बीड शहर पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) गुरुवारी दुपारी रंगेहात पकडले. या धडक कारवाईमुळे बीड पोलीस दलात प्रचंड खळबळ उडाली आहे.**

सुशेन प्रकाश उगले असे लाचखोर पोलीस कर्मचाऱ्याचे नाव असून तो बीड शहर पोलीस ठाण्यात कार्यरत आहे. एका प्रकरणातील समन्स संबंधिताला बजावण्यासाठी उगले याने आठ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. तक्रारदाराची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी याबाबात जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे रीतसर तक्रार नोंदवली होती. या तक्रारीची शहानिशा केल्यानंतर, जालना एसीबीच्या पथकाने गुरुवारी दुपारी बीडमध्ये सापळा रचला. तक्रारदाराकडून ८ हजार रुपयांची लाचेची रक्कम स्वीकारताना सुशेन उगले याला पथकाने रंगेहात ताब्यात घेतले. कर्मचारी जाळ्यात, पोलिस निरीक्षक अडचणीत जालना एसीबीचे पोलीस उपअधीक्षक बाळू जाधवर यांनी या यशस्वी कारवाईची माहिती दिली असून, आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यापूर्वीही जालना एसीबीने बीडमध्ये अनेक कारवाया केल्या आहेत. तसेच कर्मचारी पकडल्याने आता बीड शहर ठाण्याचे पोलिस निरीक्षक विनोद घोळवे हे देखील अडचणीत आले आहेत. पोलिस अधीक्षक पाटोदा प्रमाणेच घोळवे यांची उचलबांगडी करून नियंत्रण कक्षात घेणार की माजलगाव शहर आणि दिंद्रूड प्रमाणे अभय देणार, याकडे लक्ष लागले आहे.

# जिवाचीवाडी येथील सुवर्णपदक विजेती हिंदवी चौरे क्रीडा कार्यालयाकडून सन्मानित

**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील डोंगरदऱ्यात वसलेली जिवाचीवाडी पूर्वीच्या काळात जवळपास ९५ टक्के कुटुंबाचा मूळ व्यवसाय ऊस तोडणी होता.कालांतराने गेल्या पंधरा-वीस वर्षाच्या कालावधीत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जीवाचीवाडीतून आजपर्यंत ५० डॉक्टर, १५ अभियंते, एक न्यायाधीश, १० सैनिक, २५ शिक्षक,उद्योजक, सनदी लेखापाल, अभियंते ,वर्ग एक व दोनचे अधिकारी, वकील, प्राध्यापक अशा विविध पदावर गावातील भूमिपुत्रांनी गवसणी



घातली असून गेल्या दोन वर्षात जवळपास आठ ते दहा विद्यार्थी एमबीबीएस पदवी परीक्षेत पात्र ठरले आहेत. नुकतीच ऊसतोड कामगार चौरे कुटुंबातील चार मुलींची पोलीस विभागात निवड झालेली आहे. जिवाचीवाडी येथील येथील कु.हिंदवी परमेश्वर चौरे हिने वर्ल्ड योगासन चॅम्पियनशिपमध्ये दोन सुवर्णपदके जिंकून संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले आहे.

अहमदाबाद येथे झालेल्या या जागतिक स्पर्धेत तिने आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर भारताचा तिरंगा अभिमानाने उंचावला. केजच्या मातीतून घडलेल्या या प्रतिभावान सुकन्येने बीड जिल्ह्याचे नाव जागतिक पातळीवर पोहोचविले आहे. तिचा बीड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने २५ जून २०२६ रोजी जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांच्या हस्ते कु. हिंदवी हिचा शाल,पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे, परमेश्वर चौरे,लक्ष्मण चाटे,लेक लाडकी अभियानचे जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे, डॉ. लक्ष्मण पवळ, आदींची उपस्थिती होती.

# छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त व्याख्यान उत्साहात संपन्न!

**माजलगाव । प्रतिनिधी**

**आरक्षणाचे जनक छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त शासकीय व निमशासकीय कर्मचारी माजलगाव यांच्या वतीने यशोधरा बुद्धविहार येथे''आरक्षण : संविधानिक हक्क,गैरसमज आणि वास्तव''या विषयावर व्याख्यान कार्यक्रम उत्साहात व विचारप्रवर्तक वातावरणात संपन्न झाला.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयु.कमलताई श्रीमंत डोंगरे या होत्या.प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा.गोरख फसले तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध आंबेडकरवादी रिल्स स्टार आयु.रुक्मीणताई दिपक लोंढे तसेच राजेश क्षीरसागर आणि प्रा.धम्मानंद बोराडे उपस्थित होते. प्रमुख व्याख्याते प्रा.गोरख फसले यांनी आपल्या सखोल व अभ्यासपूर्ण व्याख्यानात आरक्षण ही दया,सवलत किंवा विशेष कृपा नसून भारतीय संविधानाने प्रदान केलेली सामाजिक न्यायाची यंत्रणा आहे.व तिची यशस्वी अंमलबजावणी करणे हे सरकारचे ध्येय धोरण असले पाहिजे असे नमूद केले.परंतु राज्य शासन उपवर्गीकरणाच्या नावाखाली जाती-जातीत भांडणे लावण्याचा प्रयत्न करत असून ते ओळखून आपसी भाईचारा निर्माण करण्याची नितांत गरज असल्याचे प्रतिपादीत करून अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय समाजाच्या प्रगतीमध्ये आरक्षणाचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे.असे सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना आयु.कमलताई श्रीमंत डोंगरे यांनी महिलांनी शिक्षण,संघटन व संविधानिक जागरूकतेच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनात सक्रिय भूमिका बजावावी,असे आवाहन केले. प्रमुख पाहुण्या आयु.रुक्मीणताई दिपक लोंढे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून संविधानिक विचार,वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक न्यायाचा प्रचार करण्याची गरज अधोरेखित केली.चुकीच्या माहितीला बळी न पडता अभ्यासपूर्ण भूमिका घेण्याचे आवाहन त्यांनी केले.आंबेडकरवादी विचार हाच उत्तम जीवन जगण्याची पद्धती असून मातंग भावंडाने ते वेळीच ओळखले नाहीतर आगामी काळात त्याचे भयंकर दुष्परिणाम होतील असे नमूद केले. राजेश क्षीरसागर यांनी आरक्षणाचे महत्त्व विशद करताना उपवर्गीकरणाच्या माध्यमातून बौद्ध व मातंग यांच्यामधील वाढत चाललेला तिढा त्याबद्दल चिंता व्यक्त करून,समाजातील विष पेरणाऱ्या प्रवृत्तीचा आंबेडकरवादी अनुयायानी प्रेमाने बिमोड करावा असे सांगितले.धम्मानंद बोराडे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर,राजर्षी शाहू महाराज,महात्मा फुले यांच्या विचारांचे आजच्या काळातील महत्त्व विशद केले.सामाजिक ऐक्य,बंधुता आणि संविधानिक मूल्यांवर आधारित समाजनिर्मितीची आवश्यकता त्यांनी प्रतिपादित केली.जोपर्यंत भारतीय संविधान आहे तोपर्यंत या सर्व गोष्टी शक्य आहेत.परंतु संविधानावर घाला घालत असताना आंबेडकरवाद्यानी बघ्याची भूमिका घेणे चुकीचे असल्याने सांगितले. कार्यक्रमाचे बहरदार सूत्रसंचालन अशोक वाडेकर यांनी तर प्रस्ताविक राहुल टाकणखार यांनी केले.आभार प्रदर्शन भारत टाकणखार यांनी केले कार्यक्रमास नानासाहेब घोडके,धम्मानंद साळवे,अंकुश जाधव,प्रभाकर साळवे,राजकुमार सोनवणे,अशोक कांबळे,दीपक टाकणखार,ॲड.रवींद्र टाकणखार, अशोक मगर,बाबा टाकणखार,विद्याताई निसर्गध,सुशीलाताई चांदमारे,बबितातई सावंत,शारदाताई टाकणखार,पुष्पा सोनवणे,सुनिताताई टाकणखार,मनीषा तोडके,जयश्रीताई टाकणखार,मायाताई टाकणखार,प्रियांका टाकणखार,सोनाली टाकणखार,बाबा जाधव सर,चंदनलाल बनगे,मुरलीधर भाळशंकर,श्रीमंत डोंगरे,जी.एन.घणघाव,सचिन कांबळे,दीपक लोंढे,रोकडे आप्पा,निशिकांत टाकणखार,अमर साळवे,रविकांत उघडे,अभिजीत साळवे,बन्सी डोंगरे,शत्रुघ्न कसबे,दिनेश निसर्गंध,उत्कर्ष शिंदे,संजोग कसबे,नितिन डोंगरे,तसेच वसंत टाकणखार,अमोल राऊतआबा,प्रवीण जाधव,राजेंद्र सातपुते,हनुमंत पांढरपोटे,नारायण भाळशंकर,शिवाजी भाळशंकर व विविध विभागांतील अधिकारी,कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते,नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन शासकीय व निमशासकीय कर्मचारी माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले.

## पान १ वरून...

**बळिराजाला दिलासा; राज्यात**

पावसामुळे कोयना धरणाच्या जलाशयात पाण्याची आवक २३७७ क्युसेकने सुरू आहे. गेल्या २४ तासांत जलाशयातील पाण्याच्या पातळीत सहा इंचांनी वाढ झाली आहे. पाऊस लांबणीवर गेल्याने अनेक भागात पेरण्या खोळंबल्या होत्या. आता मात्र काल झालेल्या दमदार पावसाने वाशिमच्या कारंजा तालुक्यातील विळेगाव भागात कपाशी लागवडीला सुरुवात झाली असून पेरणीयोग्य पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्याने आता पेरणीला सुरुवात केली आहे, उशिरा का होईना पेरणीयोग्य पाऊस झाल्यामुळे शेतकरी राजा सुखावला आहे. पहिल्याच पावसात अकोला जिल्ह्याचं चित्र बदललं आहे. ओढे, नाले, शेतात पाणी, नद्या दुथडी भरून वाहत आहेत. अकोला जिल्ह्यात मागील २४ तासांत झालेल्या पावसामुळे कोरड्या पडलेल्या नद्या आता दुथडी भरून वाहताना दिसत आहेत. अकोला जिल्ह्यातील सातपुडा पर्वतरांगात झालेल्या पावसामुळे या पर्वतरांगातील नदी, ओढे दुथडी भरून वाहतानाचे चित्र दिसत आहे. जळगावच्या रावेरच्या खिरवड येथील नदीला पूर आला असून दमदार पावसामुळे अनेक शेतामध्ये पाणी साचले आहे. तसेच विदर्भात मान्सून दाखल झाला असल्याने अमरावती जिल्ह्यात शेतकऱ्यांनी पेरणीला सुरुवात केली आहे.

-------------

**तुकाराम मुंढे यांचा संघर्षमय**

चर्चेत राहिले. ग्रामीण पार्श्वभूमीतून पुढे येत भारतीय प्रशासकीय सेवेत स्थान मिळविण्यापासून ते विविध पदांवर कार्य करताना आलेल्या आव्हानांचा सामना करण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास प्रेरणादायी मानला जातो. त्यांच्या आयुष्यातील संघर्ष, यश, प्रशासकीय अनुभव आणि जनतेप्रती असलेली बांधिलकी यांचा उलगडा या पुस्तकातून होणार असल्याची माहिती प्रकाशकांनी दिली आहे.

----------

**माझा भाऊ गिळला,आता**

विलास घुले यांच्या हत्येचा तपास अत्यंत संथ गतीने होत असल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. या प्रकरणातील सत्य बाहेर येण्यासाठी आणि मुख्य सूत्रधारांचा पर्दाफाश करण्यासाठी, या हत्या प्रकरणातील सर्व आरोपींची नार्को टेस्ट करण्यात यावी, अशी आग्रही मागणी रमेश घुले यांनी केली आहे.

----------

**अवैध खनिज उत्खनन**

सूचित केले आहे. केंद्र सरकारने खनीकर्म योजनेत जिल्हाधिकाऱ्यांना जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष बनवले आहे. या समितीच्या बैठका महिन्याभरात घेतल्या जाव्यात, अशा सूचना सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या जातील, असे मंत्री बावनकुळे म्हणाले.

---------

**मुद्रांक नोंदणी प्रकरणातील गैरव्यवहारांच्या**

थांबणार नसून एजीच्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्र टास्क फोर्स कार्यरत केली जाईल. या चौकशीसाठी आवश्यक मनुष्यबळ, संसाधने आणि निधी राज्य शासन उपलब्ध करून देणार असल्याचेही यावेळी सांगितले. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, ही चौकशी महसूल विभाग स्वतः करणार नसून संपूर्ण कारभार एजीकडे सोपविला जाणार असून टास्क फोर्समार्फत प्रत्येक प्रकरणाची तपासणी केली जाईल. या चौकशीत मुद्रांक अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबन, फौजदारी गुन्हे दाखल करणे आणि अन्य कठोर कारवाई केली जाणार असल्याचेही यावेळी सांगितले, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, वरिष्ठ लिपिक राजकुमार दहीफळे यांनी मुद्रांक अधिकारी म्हणून कार्यभार स्वीकारल्यानंतर अवघ्या १० दिवसांत ९४१ हून अधिक दस्तऐवजांची नोंदणी केली. या नोंदण्यांमध्ये एमआरटीपी कायदा १९६६ आणि मुद्रांक नोंदणीसंदर्भातील कायदेशीर तरतुदींचे गंभीर उल्लंघन झाल्याचा आरोप आहे. अनधिकृत इमारतींच्या नोंदणीतून शासनाला सुमारे १३ कोटी ९१ लाख रुपयांचे नुकसान झाले. या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून संबंधित अधिकाऱ्याला निलंबित करण्यात आले आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याला सेवेतून बडतर्फ करण्याच्या दिशेने शासनाची कार्यवाही सुरू आहे. शेवटी बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, मुद्रांक विभागातील ॲडज्युडिकेशन प्रक्रिया 'क्वासी-ज्युडिशियल' स्वरूपाची असली तरी ती मुद्रांक अधिनियमाच्या चौकटीतच पार पडली पाहिजे, असे सांगत मंत्री बावनकुळे यांनी नव्या मानक कार्यपद्धतीचा आदेश जारी करण्याची घोषणा केली. यापुढे नियमबाह्य ॲडज्युडिकेशन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची तरतूद करण्यात येणार असून त्यासंदर्भातील शासन निर्णयही काढण्यात येणार असल्याचे सांगितले.

---------

**ॲमेझॉनचे सीईओ अँडी जॅसी यांनी घेतली मोदींची**

गुंतवणूक करण्याची योजना जाहीर केली आहे. या नवीन घोषणेमुळे, २०२६ ते २०३० दरम्यान आणि क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चरच्या विकासासाठी ॲमेझॉनची एकूण नियोजित गुंतवणूक २१ अब्ज डॉलर्सच्या पार जाईल (ही रक्कम एकूण ४८ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीचाच एक भाग आहे). या गुंतवणुकीमुळे ॲमेझॉन भारतातील आणि क्लाउड क्षेत्रातील सर्वात मोठ्या जागतिक गुंतवणूकदारांपैकी एक बनणार आहे. या गुंतवणुकीच्या माध्यमातून मुंबई आणि हैदराबादमधील डेटा सेंटर्सची क्षमता वाढवली जाईल. यामुळे भारतातील स्टार्टअप्स, मोठे उद्योग आणि सरकारी संस्थांना सानुकूलित चिप्स, व्यवस्थापित सेवा, सुरक्षित-विश्वासार्ह क्लाउड तंत्रज्ञान आणि डेव्हलपर टूल्स उपलब्ध होतील. परिणामी, त्यांना वेगाने नवनवीन शोध लावणे, व्यवसायाचा विस्तार करणे आणि जागतिक स्तरावर ग्राहकांना सेवा देणे सोपे होईल. तसेच २०१० ते २०३० या काळात ॲमेझॉनची भारतातील एकूण एकत्रित गुंतवणूक ८८ अब्ज डॉलर्सच्या पुढे जाणार आहे. यावेळी अँडी जॅसी म्हणाले, ''गेल्या १२ वर्षांतील पंतप्रधानांची दूरदृष्टी खरोखरच उल्लेखनीय आहे. देशाच्या विकासात आणि जगातील प्रत्येक क्षेत्रात भारताचे महत्त्व कसे वाढत आहे, यावरून हे स्पष्टपणे दिसून येते. २०१० पासून तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रगण्य असलेल्या ॲमेझॉन कंपनीने भारतात ४० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली आहे, तर गेल्या वर्षी आणखी ३५ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीची घोषणा करण्यात आली होती. आम्ही आजच ही घोषणा केली आहे की, २०२६ ते २०३० दरम्यान आम्ही ही रक्कम ३५ अब्ज डॉलर्सवरून वाढवून अतिरिक्त ४८ अब्ज डॉलर्स करत आहोत,'' असे जॅसी यांनी सांगितले.

---------------

**नसरापूर प्रकरणात आरोपी**

जाहीर केले आहे. परंतू या निकालात आरोपी भीमराव कांबळे हा दोषी आढळला आहे. यामुळे पुढील अंतिम निकालात आरोपीला फाशीची शिक्षा (मृत्युदंड) की जन्मठेप कारावास होणार याकडे लक्ष लागून राहिले आहे. नराधम आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी सर्वस्तरातून होत आहे. नसरापूरमध्ये शांतता आहे. मात्र परिसरात व घटनास्थळी राजगड पोलिसांनी बंदोबस्त कायम जैसे थे ठेवून पोलीस पथक वाढविले आहे.

-----------

**एकनाथ शिंदे यांची समज**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. त्यांनी स्पष्ट केले की, लोकप्रतिनिधींनी पत्रकारांशी अशा प्रकारे वर्तन करणे चुकीचे आहे. मी या प्रकरणाची सविस्तर माहिती घेतो. पत्रकारांशी अशा प्रकारे बोलणे योग्य नाही, असे शिंदे म्हणाले. उपमुख्यमंत्री म्हणाले की, मी संजय दिना पाटील यांच्याशी चर्चा केली असून, त्यांनी आपली बाजू मांडली आहे. पाटील यांनी सांगितले की, पत्रकारांचा अपमान करण्याचा माझा कोणताही हेतू नव्हता. मात्र, दररोज माझ्या विरोधात आणि माझ्या कुटुंबाबद्दल ज्या खालच्या पातळीवर टीका केली जात आहे, त्याचा राग मनात होता. उपमुख्यमंत्र्यांनी संजय दिना पाटील यांना स्पष्ट सांगितले आहे की, जर अनवधानाने काही अपशब्द गेले असतील, तर पत्रकारांशी बोलून दिलगिरी व्यक्त करा. संजय दिना पाटील यांच्या वक्तव्यामुळे पक्षाची नाचक्की होत असल्याचे पाहून शिंदे गटातील काही नेत्यांनी तातडीने पत्रकार आणि माध्यमांची माफी मागितली आहे. संजय शिरसाट म्हणाले, संजय दिना पाटील आणि संजय राऊत यांच्यातील बोलण्यातून हा प्रकार घडला असावा. कोणालाही उघडपणे धमकी देणे किंवा शिवीगाळ करणे योग्य नाही. जर त्यांच्याकडून काही चुकीचे शब्द गेले असतील, तर मी स्वत: पत्रकारांची माफी मागतो. आम्ही त्यांना नक्कीच समज देऊ. प्रकाश सुर्वे म्हणाले, संजय पाटील खूप चांगला माणूस आहे. कदाचित फ्रस्ट्रेशन किंवा रागाच्या भरात अनवधानाने त्यांच्याकडून असे घडले असेल. जर कोणाच्या भावना दुखावल्या असतील, तर मी दिलगिरी व्यक्त करतो. अर्जुन खोतकर म्हणाले, जर तुम्ही सांगताय ते खरं असेल आणि त्यांनी खरंच शिवीगाळ केली असेल, तर ते चुकीचे आहे. लोकशाहीत प्रेस हा चौथा स्तंभ आहे. निश्चितपणे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या प्रकरणाची दखल घेतील.

-------------

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी**

कर्जाची माफी करण्यात येणार आहे. थकीत, पुनर्गठित तसेच फेरपुनर्गठित कर्जांचाही यामध्ये समावेश करण्यात आला आहे. दोन लाख रुपयांपेक्षा किंचित अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांनाही लाभ मिळावा यासाठी विशेष तरतूद करण्यात आली असून शेतकऱ्यांनी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर शासन दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम त्यांच्या कर्जखात्यात जमा करणार आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच यापूर्वीच्या कर्जमाफी योजनांचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही या प्रोत्साहनपर लाभासाठी पात्र करण्यात आले आहे. एकरकमी कर्ज निपटारा योजना (वन टाईम सेटलमेंट) प्रकरणांबाबतही शासनाने दिलासादायक निर्णय घेतला असून व्यापारी बँका, ग्रामीण बँका आणि सहकारी बँकांमधील पात्र शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. उर्वरित रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. ॲग्रीस्टॅकमध्ये नाव नसल्यामुळे कोणताही शेतकरी योजनेपासून वंचित राहणार नसल्याचे स्पष्ट करताना मंत्री पाटील म्हणाले की, प्रथम नोंदणी करून त्यानंतर लाभ दिला जाईल. आवश्यकतेनुसार विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्यातील सर्व बँकांकडील पात्र शेतकऱ्यांचा डेटा विशेष पोर्टलवर अपलोड करण्यात येत आहे. पात्र लाभार्थ्यांना स्वतंत्र युनिक क्रमांक देण्यात येणार असून ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय तसेच ऑनलाइन पोर्टलवर यादी प्रसिद्ध करण्यात येईल. आधार प्रमाणीकरण आणि मोबाईल क्रमांक नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शासनाकडून थेट संबंधित कर्जखात्यात रक्कम जमा केली जाईल. जुलैच्या पहिल्या आठवड्यात थकबाकीदार शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा करण्याचा शासनाचा प्रयत्न असून त्यामुळे खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होण्यास मदत होईल, असेही मंत्री पाटील यांनी सांगितले. या योजनेचा उद्देश केवळ कर्जमाफी देणे नसून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आणि शेती क्षेत्राला नवसंजीवनी देणे हा असल्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी स्पष्ट केले.

थोडक्यात




## मोगरा जि.प. शाळेच्या वतीने विद्यार्थांसाठी मौदानी,बुद्धीबळ खेळाचे साहित्य उपलब्ध

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोगरा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने मैदानी खेळांची साधने तसेच बुद्धीबळ खेळाचे साधने मुला-मुलींसाठी उपलब्ध करून देण्यात आले.

जिल्हा परिषद शाळेत दि २५ जुन गुरुवार रोजी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मौदानी व बुद्धीबळ खेळचे साहित्य उपलब्ध करून देण्यात आले यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सुभाष घनघाव यांनी या साहित्यामुळे विद्यार्थ्यांचे शारीरिक स्वास्थ्य, सांघिक भावना, नेतृत्वगुण आणि आत्मविश्वास वाढण्यास मदत होते.तसेच बुद्धीबळामुळे एकाग्रता,तार्किक विचारशक्ती, निर्णयक्षमता आणि बौद्धिक विकासाला चालना मिळते.विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उत्साह पाहून समाधान वाटले. अशा उपक्रमांमुळे शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य होण्यास निश्चितच मदत होईल.असे प्रतिपादन शाळेचे मुख्याध्यापक सुभाष घनघाव यांनी व्यक्त केले. यावेळी सहशिक्षक बालाप्रसाद चव्हाण,सहशिक्षक हानुमंत पांढरपोटे यांच्यासह शिक्षक व शिक्षीका उपस्थित होते.

## पाटोद्यात पावसाचे दमदार आगमन

पाटोदा । प्रतिनिधी

**बळीराजा सुखावला, पेरणीच्या आशा पल्लवित**

गेल्या अनेक दिवसांपासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या पाटोदा परिसरातील शेतकऱ्यांसाठी आजचा गुरुवार सुखद दिलासा घेऊन आला. आज शहरासह परिसरात पावसाने दमदार हजेरी लावल्यामुळे बळीराजाच्या चेहऱ्यावर पुन्हा एकदा हास्य उमलले असून, सर्वत्र आनंदाचे वातावरण पसरले आहे.

यंदाच्या हंगामात ७ जूनपासूनच पेरण्यांना सुरुवात होणे अपेक्षित होते. मात्र, पावसाने पाठ फिरवल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला होता. आकाशात ढगांची गर्दी व्हायची, पण पाऊस मात्र न पडल्याने शेतकरी वर्ग मोठ्या चिंतेत होता. पेरणीला आधीच २० दिवसांचा उशीर झाल्याने खरीप हंगामाबाबत शेतकऱ्यांच्या मनात भीती निर्माण झाली होती.

**पाणीटंचाईला मिळणार दिलासा**

केवळ शेतीच नव्हे, तर भीषण पाणीटंचाईचा सामनाही पाटोदा शहर करत होते. पावसाअभावी शहरातील विहिरी आणि जलस्त्रोत आटल्याने नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत होती. आजच्या पावसामुळे या पाणीटंचाईच्या संकटातून दिलासा मिळण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

**पेरणीचे वेध :** पावसाचे हे आगमन पाहून शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. ''जर असाच पाऊस पुढील दोन-तीन दिवस सुरू राहिला, तर जमिनीमध्ये ओलावा निर्माण होईल आणि रखडलेली पेरणी पूर्ण करता येईल,'' अशी आशा व्यक्त केली जात आहे. बळीराजा आता खत-बियाण्यांच्या नियोजनाला लागला असून, दमदार पावसाच्या सरींनी दुष्काळाच्या सावटाखालील शेतकऱ्यांना मोठा आधार दिला आहे. या पावसामुळे शहरातील नागरिकांनीही सुटकेचा नि:श्वास सोडला .

# क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट्स ॲक्टला इंडियन मेडिकल असोसिएशनचा विरोध-डॉ.इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

इंडियन मेडिकल अससोसिएशन, महाराष्ट्र शाखेने सरकार द्वारा प्रस्तावित महाराष्ट्र क्लिनिकल इस्टेब्लिशमेंट्स (रेजिस्ट्रेशन ॲण्ड रेग्युलेशन) ॲक्ट, २०२६ ला विरोध केल्याची माहिती इंडियन मेडिकल असोसिएशनचे राज्य पदाधिकारी डॉ.राजेश इंगोले यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

आमच्या प्रतिनिधीशी बोलताना आयएमएच्या आक्षेपाची प्रमुख कारणे सांगताना डॉ.राजेश इंगोले यांनी हे विधेयक सरकारने संघटनेचेशी चर्चा न करताच मसुदा तयार केला. वैद्यकीय क्षेत्राशी, तज्ज्ञांशी, डॉक्टरांच्या संघटनाशी पुरेशी चर्चा न करता मसुदा तयार केला. ऑफिसीअल ड्राफ्ट अजून चर्चेसाठी उपलब्ध नसताना कशाच्या आधारे हे विधेयक सरकार विधिमंडळात मान्यतेसाठी मांडत आहे. एखादा सुधारित कायदा तयार करायचा असेल तर त्याला सार्वजनिक प्रसिद्धी द्यावे लागते त्यावर जनतेमधून आक्षेप आल्यास त्या आक्षेपांना समर्पक उत्तर द्यावे लागतात आणि त्यानंतर हे विधेयक अंतिम मंजूर साठी मांडण्यात येते. परंतु, हे विधेयक कुठल्याही सार्वजनिक स्वरूपात प्रसिद्ध न करता घाईगडबडीने हे विधेयक मंजूर करण्याची गडबड सरकारला का झाली आहे असा सवाल डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी केला. या विधेयकामुळे इन्स्पेक्टर राज बाबू राजची भीती निर्माण झाली आहे. सरकारी अधिकाऱ्यांना भ्रष्टाचार करण्यासाठी आणखी एक कुरण निर्माण होण्याची भीती या प्रस्तावित विधेयकामध्ये आहे. नोंदणी सक्तीची, ५ लाख रूपये दंड तसेच ६ महिने कैद, जाचक अटी, अशा कडक तरतुदींमुळे छोट्या दवाखान्यांचा, हॉस्पिटलचा छळ होईल. छोट्या हॉस्पिटलवर बोजा ४० बेडपेक्षा कमी हॉस्पिटलला कायद्याच्या कक्षेबाहेर ठेवा अशी मागणी यां विधेयकात करावी ही आयएमएची मागणी आहे. कारण, सरकारी दवाखान्यातच पात्र नर्स-स्टाफची कमतरता आहे. वाढिव नोंदणी फी, महागड्या मूलभूत सुविधा ह्या डॉक्टर्स आणी रूग्णांना सुद्धा परवडणार नाहीत. जुने वादग्रस्त नियम २०२१ च्या बीएनएचआर ए दुरूस्तीतील किचकट अटी, अग्निशमन दल ना हरकत प्रमाणपत्र, एनव्हार्नमेंटल प्रमाणपत्र, प्रदूषण प्रमाणपत्र हे नियम सोपे करा, आधी त्यावर चर्चा करा अशी मागणी संघटने तर्फे करण्यात येत आहे. सरकार हा कायदा विधानसभेच्या चालू अधिवेशनात मांडण्याचा विचार करत आहे ही गडबड सरकारने करू



नये अन्यथा इंडियन मेडिकल असोसिएशन संपूर्ण राज्यभरात या प्रस्तावित जुलमी विधेयकाविरूद्ध पूर्ण ताकतीने विरोध करेल. बॉम्बे नर्सिंग होम्स रजिस्ट्रेशन ॲक्ट, १९४९ बदलवून हॉस्पिटल, क्लिनिक, नर्सिंग होम, डायग्नोस्टिक सेंटरसाठी एकच नियमावली आणणार यामुळे छोट्या मोठ्या दवाखान्यांना अडचणी निर्माण होवून कॉर्पोरेट हॉस्पिटलची निर्मिती वाढेल आणि याचा अप्रत्यक्षपणे दरवाढीचा फटका रूग्णांना व सामान्य जनतेला पडणार आहे असे मत डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले. त्यामुळे मसुदा लागू करण्याआधी वैद्यकीय संघटनांशी चर्चा करा व हा अन्याय होणार नाही याची काळजी सरकारने घ्यावी.

या धर्तीवर आयएमएच्या मागण्या खालील प्रमाणे आहेत अशी माहिती डॉ.राजेश इंगोले यांनी दिली. मसुदा सार्वजनिक करावा. आधी मसुदा पब्लिक डोमेनमध्ये टाका, मग चर्चा करा. ४० बेडखालील हॉस्पिटलना सूट द्या, कारण ते आधीच वाढत्या खर्चामुळे अडचणीत आहेत. मॅनपॉवर नॉर्म्स शिथिल करा, प्रशिक्षित नर्स-स्टाफची कमतरता असताना कडक नियम व्यवहार्य नाहीत. फायर प्रमाणपत्र व पर्यावरण प्रदूषण नियम सोपे करा, मसुदा अजून अधिकृतपणे जाहीर झालेला नाही, फक्त मीडिया रिपोर्ट्सवरून चर्चा सुरू आहे. प्रत्येक क्लिनिक, हॉस्पिटलला सरकारकडे नोंदणी करावी लागेल. नियम मोडल्यास ५ लाख रूपये पर्यंत दंड व ६ महिने कैद - त्यामुळे डोकमेंटेशन, फायर सेफ्टी, स्टाफ बाबत काळजी घ्यावी लागेल. छोट्या हॉस्पिटलच्या डॉक्टरांच्या क्लिनिकला नर्स, बायोमेडिकल वेस्ट, इमारत नियम पाळणे खर्चिक होऊ शकते. त्याचा अतिरिक्त भार अप्रत्यक्षपणे रूग्णांवर व सर्वसामान्य जनतेवर पडणार आहे. इंडियन मेडिकल असोसिएशन विरोध करत असल्याने मसुद्यात बदल होण्याची शक्यता आहे. प्रस्तावित कायदा आरोग्यसेवेत दर्जा आणेल का नाही हे माहिती नाही. पण, आयएमएला भीती आहे की, चर्चा न करता, कडक दंडात्मक तरतुदींमुळे इन्स्पेक्टर बाबू राज येऊन छोटी हॉस्पिटल बंद पडतील. या संभाव्य धोक्यामुळं हा कायदा पारीत करण्याआधी सरकारने संघटनेशी चर्चा करूनच हे विधेयक इंडियन मेडिकल असोसिएशनच्या आक्षेपांना योग्य उत्तरे व संघटनेच्या म्हणण्यानुसार बदल करून सुधारित विधेयक आणावे ही मागणी इंडियन मेडिकल असोसिएशन करीत आहे असे इंडियन मेडिकल असोसिएशनचे सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी सांगितले. लवकरच महाराष्ट्रामध्ये या प्रस्तावित विधेयकामुळे सर्वसामान्य जनतेची कशी लूट होणार आहे. या कायद्यामुळे डॉक्टरांना त्यांच्या दवाखान्यातील सर्व प्रकारचे दर वाढवावे लागतील याचा सर्वाधिक फटका आधीच महागाईने होरपळत असलेल्या जनतेला बसणार आहे त्यासाठी ह्या विधेयकाला सर्वसामान्य जनतेच्या दरबारात नेऊन न्याय मागणार आहे व याविरुद्ध मोठे आंदोलन महाराष्ट्रभर तयार करण्यात येईल अशी माहिती राज्य पदाधिकारी डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी माध्यमांना दिली.

# पत्रकारांना जिवे मारण्याची धमकी देणाऱ्या संजय दिना पाटील यांचा निषेध

मुंबई । प्रतिनिधी

पत्रकारांना जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या मुजोर खासदार संजय दिना पाटील याचा अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती आणि डिजिटल मिडिया परिषदेने तीव्र शब्दात निषेध केला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांना दिलेल्या धमकीची दखल घेऊन संजय दिना पाटील याच्यावर कडक कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी एस. एम. देशमुख यांनी केली आहे..संजय दिना पाटील यांना वाय दर्जाची सुरक्षा व्यवस्था आहे.. सुरक्षा व्यवस्थेवरील पोलिसांसमोर त्यांनी ही धमकी दिली आहे हे अधिक गंभीर असून त्यांची सुरक्षा व्यवस्था काढून घ्यावी अशी मागणीही एस. एम. देशमुख यांनी केली आहे..

संजय दिना पाटील आणि अन्य पाच खासदारांनी शिवसेना सोडून शिंदे गटात प्रवेश केला आहे.. त्यासंदर्भात त्यांची भूमिका, मतं जनतेपर्यंत पोहोचविणे हे पत्रकारांचे कर्तव्य आहे.. त्यासाठीच पत्रकार संजय दिना पाटील यांच्या घरी गेले होते.. तेथे गेल्यानंतर काही अडचणीचे प्रश्न विचारल्यानंतर संजय दिना पाटील भडकले आणि त्यांनी पत्रकारांना शिविगाळ सुरू केली..

परत आलात तर मारून टाकील, घरासमोर उभे करतोय मध्ये घुसण्याचा प्रयत्न करू नका, माझी तक्रार कोणाकडे करायची ती करा अशी अर्वाच्च, आणि अरेरावीची भाषा संजय दिना पाटील यांनी वापरली .. खासदाराला न शोभणारी ही भाषा संतापजनक आहे.. याचा आम्ही तीव्र शब्दात निषेध करीत आहोत असे मत देशमुख यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात व्यक्त केले आहे..

माझ्याकडे बॉम्ब आहे माझ्याकडं निदर्शनं करायला कोणी आलं तर बॉम्ब टाकेल, तसेच मी पाच खून केलेले आहेत अशी भाषा शिवसेनेला उद्देशून संजय दिना पाटील यांनी त्याअगोदर वापरली आहे.. एक खासदार माझ्याकडे बॉम्ब आहे अशी उघड धमकी देत असेल तर ते अत्यंत गंभीर आहे, संजय दिना पाटलाकडे खरंच बॉम्ब आहे का? असेल तर तो कोठून आला? याचीही चौकशी झाली पाहिजे अशी मागणीही एस. एम. देशमुख यांनी केली आहे..

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेने प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकावर अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर , विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, मुंबई विभागीय सचिव दीपक कैतके, डिजिटल मिडिया परिषदेचे अनिल वाघमारे आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

पान ६ वरुन...

## कोयत्याने वार करून

या गुन्ह्यांचा समांतर तपास एलसीबीचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर व त्यांचे पथक करत होते. सीसीटीव्ही फुटेजचे विश्लेषण आणि तांत्रिक तपास करत असताना, पोलीस अंमलदार बाळू सानप यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून संशयित आरोपी इंदापूर (जि. पुणे) येथे असल्याचे निष्पन्न झाले.

पथकाने तात्काळ इंदापूर येथे जाऊन माऊली नामदेव पवार (वय २६), मयूर ऊर्फ ओंकार नितीन भोसले (वय २२) आणि आदित्य ऊर्फ बाळा सिद्ध पवार (वय १९) या तिघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून चोरीला गेलेला मुद्देमाल व गुन्ह्यात वापरलेला कोयता जप्त करण्यात आला आहे. सर्व आरोपींना पाटोदा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक औदुंबर मस्के करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत आणि अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, श्रीराम खटावकर व त्यांच्या पथकाने केली.

## ग्रामपंचायत भावनांचा

याबरोबरच उपमुख्य कार्यकारी अधिकारी काळे यांनाही यासंदर्भात पत्र देऊन कारवाई करू नये अशी मागणी केली.

राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियानांतर्गत ग्रामपंचायत इमारत भवन साठी शासनाने २८ ग्रामपंचायती मंजूर केल्या ग्रामपंचायतच्या वैयक्तिक अडचणीमुळे ४ रद्द झाल्या. पहिला हप्ता ७४ लक्ष रु चा वितरित झाला. दुसरा हप्ता १५ लक्ष रु.चा वेळे अभावी पंचायत राज यांनी लिमिट काढून घेतली. म्हणजे तो निधी कधीच मिळणार नाही असं नाही तो निधी मिळतो परंतु काही महाशयांनी याचा बाऊ करून तो निधी कधी मिळणारच नाही असा आव आणून जिल्हा परिषद बीड येथील कर्मचारी अशोक खरसाडे यांना बदनाम करण्याचा प्रयत्न केला. या संदर्भात वृत्तपत्रांना चुकीची माहिती देऊन खोटे वृत्त प्रसिद्ध केले.

ज्या ग्रामपंचायतचा निधी वापस गेला त्यांची कुणाची तक्रार नाही . त्यामध्ये ग्रामपंचायत नित्रुड गावचे सरपंच , ग्रामपंचायत टाकरवन चे सरपंच, ग्रामपंचायत येथील सरपंच, ग्राम. तेलगाव येथील सरपंच असे सर्व सरपंच एकत्रित येऊन आमची अशोक खरसाडे बाबत कसलीही तक्रार नाही. या व्यक्तीने आमच्याकडून कुठलीही अपेक्षा केली नाही.आम्हला प्रत्येकवेळी निस्वार्थी मदत केली. त्यांच्यामुळे व जिल्हा परिषदेमुळे आम्हाला २५ लक्ष पेक्षा जास्तीचा निधी मिळून आम्ही चांगली इमारत होऊन ग्रामपंचायत साठी बांधू लागलो. त्यांना कुणी आमच्या नावाखाली बदनाम करत असेल तर त्याची चौकशी लावा . परंतु अशा कोणत्या बातमीच्या आधारे प्रमाणिक काम करणाऱ्या माणसावर कारवाई करू नये अशी सरपंच संघटनेच्या माध्यमातून उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांची देखील भेट घेऊन काम करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांच्या मागे सरपंच संघटना खंबीर पाठीमागे आहे. असे सरपंच उपसरपंच संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष परमेश्वर तळेकर यांनी पत्रकात म्हटले आहे. यावेळी वडवणी तालुक्यातील परडी मालेगावचे सरपंच माधव शेंडगे , गेवराई तालुक्यातील ग्रामपंचायत कोळगाव येथील सरपंच राजेंद्र कदम, ग्रामपंचायत टाकरवन तालुका माजलगाव येथील सरपंच एस.बी तौर ,ग्रामपंचायत कुर्ला तालुका बीड येथील उपसरपंच महादेव पटेकर, नित्रुड तालुका माजलगाव येथील ए.एस.डाके. गणेश अंभोरे, सरपंच बहादर पूर शिवराम गिरे, राऊत,कराळे,जगताप आदी सरपंच उपसरपंच उपस्थित होते.

## भागवत ग्रंथ हा मानवी जीवनाला

दिनकरराव तांदळे महाराज, भाऊसाहेब कोकणे, ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,पत्रकार शरद रेडेकर

हनुमान खाडे, घनशाम खलासे, किसन रासकर, इंजि.पी.बी. बोडखे, दत्तात्रय निंबाळकर, कपिल अग्रवाल, हौसराव आजबे, सरपंच सौ.शालन मुळे,माजी सरपंच आदिकाताई लोखंडे, तुकाराम भोसले, अनिलदेवा बिवरे, के.बी.खाडे,न्ननवरे सर,प्रा.सुभाष रासकर आदी मान्यवरांची मोठी उपस्थिती होती.महिलांची व भाविकांची उल्लेखनीय गर्दी, दरवर्षीप्रमाणे याही वर्षी या संगीत भागवत कथेला आष्टी शहर, बीड परिसर आणि पंचक्रोशीतील हजारो भाविक, वारकरी आणि संत वाङ्मयाचे प्रेमी दररोज हजेरी लावत आहेत. माऊली मंदिर परिसरामध्ये महिलांची गर्दी अत्यंत उल्लेखनीय आहे.अखंड हरिनाम सप्ताहामुळे संपूर्ण परिसर भक्तीमय झाला असून विठ्ठल-नामाच्या गजराने आसमंत दुमदुमून गेला आहे. सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी माऊली सेवा मंडळ, मंदिर कमिटीचे सर्व सदस्य आणि स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने परिश्रम घेत आहेत.

## शिक्षण क्षेत्रातील बाजारीकरणामुळे विद्यार्थी अनेक शालेय सुविधांपासुन वंचित

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने शाळा मान्यता देताना विद्यार्थ्यांसाठी भौतिक सुविधा असणे आवश्यक असताना अंबाजोगाई तालुक्यात अनेक शाळांमध्ये विविध नियमांची नियमावली दिलेली असताना त्या नियमांचे उल्लंघन करून अनेक मातब्बर व्यक्ती शाळा चालवत आहेत अनेक शाळेमध्ये गोरगरिबांची मुले शिक्षण घेत असून त्यांच्या या सर्व असुविधांचा सामना करावा लागत आहे सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने अनेक शाळेच्या परिसरामध्ये घाणीचे साम्राज्य असल्याने तेथे मच्छर उत्पन्न होऊन विद्यार्थी तथा विद्यार्थिनींना डेंगू मलेरिया यासारखे गंभीर आजारांना सामोरे जाण्याची शक्यता न करता येत नाही तसेच आंबेजोगाई तालुक्यातील सर्व शाळांची तपासणी करण्यात यावी तसेच प्रामुख्याने गोदावरी बाई कुंकूलोळ कन्या शाळा परळी रोड अंबाजोगाई या शाळेची सखोल तपासणी करून सदर शाळेकडून शासनाच्या नियमांचे उल्लंघन होत असल्याचे दिसून येत आहे संबंधित शाळेमध्ये वर्गखोल्या ह्या अत्यंत अस्वच्छ असून त्यामध्ये विद्यार्थ्यांना बसणे मुश्किल झाले आहे सदर शाळेतील वर्गखोल्या मध्ये पंखे नाहीत त्यामुळे विद्यार्थिनींना गर्मीमध्ये तासन तास बसावे



लागत आहे सदर शाळेत शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही त्यामुळे विद्यार्थिनींना पाण्याअभावी राहावे लागत आहे संबंधित शाळेमध्ये अनेक असुविधा असल्याने त्याचा विपरीत परिणाम विद्यार्थिनींच्या आरोग्यावर होत असल्याचे दिसून येत आहे महाराष्ट्र शासनाने शाळा मान्यता देताना जे नियम व अटी लागू केले आहेत तेच नियम व अटी या शाळेने न पाळल्यामुळे संबंधित शाळेवर कारवाई करण्यात यावी या आशयाचे निवेदन गटशिक्षण अधिकारी गटशिक्षण कार्यालय अंबाजोगाई यांना देण्यात आले यावेळी लोक जनशक्ती पार्टीचे युवा मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश वाहूळे बीड जिल्हा अध्यक्ष अशोक काळे केज तालुका अध्यक्ष गंगाधर पोळ परळी तालुका अध्यक्ष विशाल शेवाळे अकबर पिंजारी सुमित आवाडे व इतर उपस्थित होते.

## ज्येष्ठ साहित्यिक उत्तमजी कांबळे यांच्या व्याख्यानास उपस्थितीत रहावे -ॲड.राऊत

बीड । प्रतिनिधी

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद बीड जिल्हा आयोजित क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षा निमित्त छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून ज्येष्ठ साहित्यिक उत्तमराव कांबळे (नाशिक) यांच्या व्याख्यानाचे आयोजन शुक्रवार दि. २६ जून २०२६ रोजी सकाळी ११ : ३० वाजता हॉटेल नीलकमल नगर रोड बीड येथे करण्यात आले असून या व्याख्यानाच्या कार्यक्रमास शाहू - फुले - आंबेडकर प्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक महात्मा फुले समता परिषदेची प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत यांनी केले आहे.

११ एप्रिल २०२६ ते ११ एप्रिल २०२७ हे वर्ष समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष ना. छगनराव भुजबळ साहेब यांच्या संकल्पनेतून व माजी खा. समीरभाऊ भुजबळ आ. पंकजभाऊ भुजबळ यांच्या पाठपुराव्यामुळे महाराष्ट्र शासनाने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले द्विशताब्दी जयंती वर्ष घोषित केलेले आहे. या अनुषंगाने वर्षभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून भिडे वाड्यातील क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेल्या पहिल्या मुलींच्या शाळेचा चित्ररथ बीडमध्ये आणण्यात आला होता. आता शुक्रवार दिनांक २६ जून २०१६ रोजी सकाळी ११ : ३० वाजता हॉटेल नीलकमल नगर रोड बीड येथे ''छत्रपती राजश्री शाहू महाराजांचे आरक्षणाविषयी तत्कालीन धोरण व आजची परिस्थिती'' या विषयावर ज्येष्ठ साहित्यक उत्तमराव कांबळे (नाशिक) यांच्या व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस प्रा. सत्संग मुंडे, तुलसी समूहाचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे, समाजा परिषदेचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष आबासाहेब खोत, साहित्यिक डॉ. सतीश साळुंके (बीड), परीट समाजाचे प्रदेश कार्याध्यक्ष गणेश जगताप, बीड नगरपालिकेच्या नगरसेविका सावित्री नितीन साखरे आदी मान्यवरांची उपस्थिती लागणार आहे. तरी या व्याख्यान कार्यक्रमास समता परिषदेचे पदाधिकारी, समता सैनिक, शाहू - फुले - आंबेडकर प्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत, समता परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे, जिल्हा कार्याध्यक्ष अविनाश उगले, शहराध्यक्ष नितीन राऊत, राममेजर राऊत, नितीन साखरे, संतोष रासवे, जे. डी. शाह, बापू गाडेकर, दिगंबर नाईकनवरे, सावता काळे, जगन खेत्री, दत्ता बोडखे, कृष्णा शिंदे, मुकुंद शिनगारे, सचिन राऊत, दत्ता गोंदणे, शितलदास अडसुळे, धनंजय काळे, मंगेश जमदाडे, सचिन आडसुळे, अजय राऊत, स्वप्निल शिंदे, राजाभाऊ कटारे, महेश व्यवहारे, अजिंक्य सुरवसे, सुमंत राऊत, शरद विटकर, श्रीमती जयश्री आनंदराव मेश्राम (खेत्री) यांच्यासह समता परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# खाडेवाडीच्या रस्त्याचा वनवास संपला

### ग्रामस्थांचा २० वर्षाचा लढा अखेर समंजस भूमिकेमुळे यशस्वी ठरला, भाजपाचे युवा जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांच्यासह तालुका प्रशासनाचा ग्रामस्थांच्या वतीने हृदयपूर्वक सत्कार

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील मौजे सोन्नाखोटा ग्रामपंचायत अंतर्गत असणाऱ्या खाडेवाडी येथील ग्रामस्थांना ये-जा करण्यासाठी तब्बल वीस वर्षापासून रस्ता नव्हता. हा रस्ता व्हावा म्हणून अनेक वेळा शासन दरबारी उंबरटे झिजवले. परंतु हा रस्ता होत नव्हता. अखेर ग्रामस्थ व शेतकरी यांच्या समंजस भूमिकेमुळे तब्बल २० वर्षानंतर खाडेवाडीला रस्ता मिळाला आहे. यामुळे ग्रामस्थांमधून आनंद व्यक्त करत या लढ्यात गावकऱ्यासोबत खांद्याला खांदा लावून सहभागी असणारे भाजपाचे युवा बीड जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांच्यासह तहसीलदार वैभव महेंद्रकर यांच्यासह आदी मान्यवरांचा ग्रामस्थांच्या वतीने हृदयपूर्वक सत्कार करण्यात आला. याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी तालुक्यातील मौजे सोन्नाखोटा ग्रामपंचायत कार्यालया अंतर्गत खाडेवाडी वस्ती येते. या खाडेवाडीला ये श-जा करण्यासाठी मुबलक साधा रस्ता देखील नव्हता. वीस वर्ष प्रशासन दरबारी उंबरठे झिजवले. परंतु अंतर्गत ग्रामस्थांच्या वादामुळे हा रस्ता होत नव्हता. अखेर या रस्त्यासाठी ग्रामस्थांनी वडवणी तहसीलकडे सतत पाठपुरावा केला. गावकऱ्यांच्या बाजूने तीन वेळेस निकाल देखील आला. परंतु पुन्हा वरिष्ठ कार्यालयाकडे अपील, तोपर्यंत तहसीलदारांची बदली. अशा पद्धतीत हा रस्ता खोळंबला होता. खाडेवाडीतील तरुणांनी व गावकऱ्यांनी ठरवले, रस्ता होईपर्यंत माघार आता नाही म्हणून पुन्हा लढा सुरू ठेवला. पाच महिने निवेदन, आंदोलनाचा इशारा, जुने निकाल, नवीन तारखा, कागदपत्रे, फाईली आणि संघर्ष कायम ठेवत ठेवला आणि अखेर तहसीलदारांनी देखील गावकऱ्यांच्या बाजूने निकाल दिला. पुन्हा उपविभागीय कार्यालय माजलगाव यांच्याकडे अपील झाले. प्रचंड जनरेटा असल्या कारणाने राज्याच्या मंत्री पंकजाताई मुंडे यांनी देखील या प्रकरणात विशेष लक्ष देऊन अखेर ग्रामस्थ व संबंधित शेतकऱ्यांनी समंजस भूमिका घेऊन हा रस्ता खुला केला आहे. वीस वर्षाच्या लढायला अखेर यश मिळाले असल्याने ग्रामस्थांमधून आनंद व्यक्त केला जात असून या लढ्यात ज्यानी मोलाचे सहकार्य केले असे भाजपा युवा आघाडीचे बीड जिल्हाध्यक्ष संजय आंधळे, तसेच प्रशासनातील तहसीलदार वैभव महेंद्रकर, माजी नगरसेवक सतीश बडे, बाजार समितीचे संचालक डॉ. रोहिदास खोटे, सरपंच ऋषी खोटे, महसूल अधिकारी मंगेश बुचूटे, सिद्धू वाव्हळ या सर्वांचा ग्रामस्थांच्या वतीने हृदयपूर्वक सत्कार व आभार मानण्यात आले आहेत.





cmyk

राज्य लोकतंत्र

शेत-शिवार

शुक्रवार दि.२६ जून २०२६

४

# शेतकऱ्यांना दिलासा:पैठण तालुक्यात पावसाच्या हजेरीमुळे खरीप पेरणीस वेग

## तालुक्यात सरासरी २६.९ मि.मी. पाऊस

पैठण। प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून तीव्र उकाड्याने आणि पावसाच्या दीर्घ प्रतीक्षेने कोरड्या पडलेल्या पैठण तालुक्याला अखेर दोन दिवसांच्या समाधानकारक आणि सर्वदूर झालेल्या भिज पावसाने मोठा दिलासा दिला आहे. या दमदार हजेरीमुळे खरीप पेरण्यांच्या कामांना वेग आला आहे.

जून महिन्याचा शेवटचा आठवडा सुरू झाला तरी वरुणराजाने दडी मारल्यामुळे तालुक्यातील शेतकरी वर्ग कमालीचा चिंतेत सापडला होता. दुबार पेरणीचे संकट ओढवते की काय, अशी भीती व्यक्त केली जात होती. मात्र, मंगळवारी व बुधवारी तालुक्यातील बहुतांश महसूल मंडळांमध्ये दमदार पावसाची नोंद झाली. या संततधार भिज पावसामुळे शेतजमिनी पार खोलवर ओलावल्या आहेत. परिणामी, शेतकरी आता सोयाबीन, कापूस, मका आणि बाजरी आदी पिकांच्या पेरणीसाठी शेतात उतरले आहेत. हवामान विभागाने आगामी



दोन दिवसांत तालुक्यात आणखी चांगल्या पावसाचा अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे पेरणीच्या क्षेत्रात झपाट्याने वाढ होईल, असा विश्वास तालुका कृषी अधिकारी विकास पाटील यांनी व्यक्त केला आहे. पावसामुळे ग्रामीण भागात ट्रॅक्टर आणि बैलगाड्यांच्या साहाय्याने पेरणीची लगबग वाढली असून, बाजारपेठेतील कृषी सेवा केंद्रांवर खरेदीसाठी गर्दी होत आहे.तालुक्यातील मंडळनिहाय पर्जन्यमान (मिलिमीटरमध्ये) बालानगर ६३ मिमी, आडुळ ४३, पाचोड, ३५, ढोरकीन ३३, पैठण २१, लोहगाव २१, नांदर २०, विहामांडवा १५, पिंपळवाडी १०, बिडकीन ८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. आतापर्यंत एकूण पाऊस २६९ मिमी असून, दैनिक सरासरी २६.९ मिमी तर आजवरची सरासरी २७.४ मिमी आहे. कृषी सेवा केंद्रांवर खते, बियाणे खरेदीसाठी गर्दी पैठण तालुक्यातील पावसामुळे ग्रामीण भागात ट्रॅक्टर आणि बैलगाड्यांच्या साहाय्याने पेरणीची लगबग वाढली असून, बाजारपेठेतील कृषी सेवा केंद्रांवर बियाणे व खते खरेदीसाठी शेतकऱ्यांची गर्दी उसळत असल्याचे चित्र आहे. आकडेवारीनुसार, बुधवारी तालुक्यात एकूण २६९ मिमी पावसाची नोंद झाली असून, त्याची दैनिक सरासरी २६.९ मिमी इतकी आहे. पैठणसह बिडकीन, ढोरकीन येथे बियाणे खरेदीस प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे.

## गोगलगायीच्या नियंत्रणासाठी जाणून घ्या सोपे उपाय



गोगलगायी जून ते सप्टेंबर या काळात अत्यंत सक्रिय असतात व रोपावस्थेतील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करतात त्यामुळे पीक संपूर्ण नष्ट होते. गोगलगाय ही बहूभक्षी किड असून ती विशेषत: रोपावस्थेत पिकाचे अधाशासारखे पाने खाऊन अतोनात नुकसान करते. निशाचर असल्याने रात्रीच्या वेळी बाहेर पडलेल्या गोगलगायी रोपांची पाने खातात व शेताचे नुकसान होते.

गोगलगायी नियंत्रणासाठी उपाय : सायंकाळी किंवा सूर्योदयापूर्वी शेतातील गोगलगायी गोळा करून साबणाच्या अथवा मिठाच्या पाण्यात बुडवून माराव्यात किंवा शेतातून मोठ्या शंखी गोगलगायी जमा करून प्लास्टिकच्या पोत्यात भरून त्यात कोरडे मीठ अथवा चुना टाकून त्या पोत्याचे तोंड उघडे न ठेवता घट्ट बंद करावे, जेणेकरून त्यामधील गोगलगायी पोत्यातून बाहेर न जाता मिठाच्या किंवा चुन्याच्या संपर्कात येऊन आतमध्येच मरून जातील.

गोगलगायी जमा करताना अथवा हाताळणी करताना उघड्या हाताने न करता हातमोजे व तोंडावर मास्क घालूनच करणे गरजेचे आहे. शेतामध्ये किंवा बागेमध्ये ७ ते ८ मीटर अंतरावर वाळलेल्या गवताचे किंवा भाजीपाला पिकाच्या अवशेषाचे ढीग अथवा गोणपाट गुळाच्या पाण्यात ओले करून शेतात ठिक ठिकाणी ठेवावेत. गोगलगायी त्या ठिकाणी आश्रयाला जातात. सूर्योदयानंतर त्याखाली गोळा झालेल्या गोगलगायी व त्यांची अंडी गोळा करून मिठाच्या पाण्यात टाकून नष्ट करावी.

## तुरीचे सुधारित वाण आणि वैशिष्टे

तूर हे खरीप हंगामातील अत्यंत महत्वाचे पीक. राज्यात सर्वसाधारणपणे १२ ते १३ लाख हेक्टर क्षेत्रावर अति लवकर, मध्यम लवकर आणि मध्यम ते उशिरा कालावधीच्या वाणांची निर्मिती राज्यातील कृषि विद्यापीठांनी केली आहे. तुरीच्या अधिक उत्पादनासाठी पाऊसमान आणि जमिनीचा प्रकार लक्षात घेऊन योग्य वाणांची पेरणी करणे फायदेशीर ठरते. तुरीच्या वाणाची निवड करताना जमिनीच्या प्रकारानुसार करणे गरजेचे असते. कारण भारी जमिनीत अधिक उत्पादन देणारे तुरीचे वाण हे मध्यम ते हलक्या जमिनीत तितकेच उत्पादन देतील असे नाही. मध्यम प्रकारच्या जमिनीकरिता कमी कालावधीत परिपक्व होणाऱ्या वाणांची निवड करावी. लट भारी जमीन असेल तर मध्यम ते उशिरा कालावधीत परिपक्व होणाऱ्या वाणाची निवड करावी.

बी डी एन ७११ : मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रात कोरडवाहू लागवडीसाठी, हलक्या व मध्यम जमिनीत पेरता येणारा १५० ते १५५ दिवसात तयार होणारा ,एकाच वेळी पक्व होणारा,यांत्रिक पद्धतीने काढता येणारा शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरलेला वाण.

बी डी एन ७११, गोदावरी, बी एस एम आर ८५३ : लाल/तांबड्या /तपकिरी/फिकट तपकिरी दाण्याचे वाण :फुले राजेश्वरी, फुले तृप्ती, फुले पल्लवी, बी डी एन ७०८, बी डी एन ७१६, रेणुका, बी एस एम आर ७३६, आय सी पी एल ८७, आय सी पी एल ८७११९, पी.के.व्ही तारा, पी.डी. के.व्ही .आश्लेषा,ए के.टी ८८११ .



फुले पल्लवी (फुले तूर १२-१९-२) - वैशिष्टे : मध्यम पक्वता कालावधी ,दाणे टपोरे फिकट तपकिरी ,मर व वांझ या रोगास मध्यम प्रतिकारक्षम शेंगा पोखरणारी अळी,शेग माशी या किडींना कमी बळी, हेक्टरी उत्पादन:२१.४५ क्किं/हे.

फुले तृप्ती - वैशिष्टे : दाणे आकाराने टपोरे ,दाण्याचा रंग फिक्कट तपकिरी मार व वांझ रोगास मध्यम प्रतिकारक्षम शेंगा पोखरणारी अळी आणि शेंगमाशी या किडीचा प्रादुर्भाव कमी. हेक्टरी उत्पादन:२२-२३ क्किं/हे. फुले राजेश्वरी - वैशिष्टे : तांबड्या रंगाचे टपोरे दाणे , मर व वांझ रोगास प्रतिकारक्षम. हेक्टरी उत्पादन: २८-३० क्किं/हे. पी.के .व्ही.तारा - वैशिष्टे : दाण्याचा रंग लाल ,मर व वांझ रोगास प्रतिकारक्षम. हेक्टरी उत्पादन:१९-२० क्किं/हे. पी.डी. के.व्ही.आश्लेषा - वैशिष्टे : दाणे टपोरे आणि लाल रंगाचे,मर,वांझ, करपा आणि पानावरील ठिपके या रोगांना मध्यम प्रतिकारक्षम, जिरायत लागवडीसाठी योग्य. हेक्टरी उत्पादन :१९-२० क्किं/हे. ए के टी ८८११ - वैशिष्टे : दाण्याचा रंग लाल,मध्यम टपोरे दाणे, मर रोगास मध्यम प्रतिकारक्षम हेक्टरी उत्पादन: १०-११ क्किं/हे.

बी डी एन पी एच-१८-५ - वैशिष्टे:राज्यातील पहिला संकरित वाण,दाण्याचा रंग पांढरा,मर व वांझ रोगास मध्यम प्रतिकारक्षम. हेक्टरी उत्पादन:१८ -२२ क्किंटल /हेक्टर.

बी डी. एन ७०८ (अमोल) - वैशिष्टे : शेंगा गर्द लाल, दाणे चमकदार लाल रंगाचे, मध्यम आकाराचे, शेंगा पोखरणाऱ्या किडीस सहनक्षम. हेक्टरी उत्पादन:१६-१८ क्किंटल / हेक्टर.

बी.डी. एन ७११ - वैशिष्टे : दाणा पांढरा, हलक्या व मध्यम जमिनीस योग्य,शेंगा एकाच वेळी पक्व, यांत्रिक पद्धतीने काढता येतात,लवकर पक्व होत असल्याने रब्बीत दुबार पीक घेणे शक्य. हेक्टरी उत्पादन:१६-२३ क्किंटल /हेक्टर. याशिवय बी.डी. एन ७१६, गोदावरी (बी.डी.एन. २०१३ ४१), रेणुका, बी.एस एम आर. ७३६, बी.एस एम आर ८५३, इक्रीसॅट,हैद्राबाद विकसित वाण, आय सी पी एल ८७ ( प्रगती), आय सी पी एल ८७११९ (आशा), ही वाणही प्रसिद्ध आहेत. वरील नमूद तुरीच्या वाणाच्या बियाण्याच्या उपलब्धते संबंधित कृषी विद्यापीठ, शेतकऱ्यांच्या बीजोत्पादन कंपनी, महाबीज किंवा शासनाच्या इतर मान्यताप्राप्त कंपन्या यांच्याशी आपण संपर्क करू शकता. या संदर्भामध्ये अधिक माहिती संबंधितांकडून प्राप्त होऊ शकते. जमिनीचा प्रकार, संरक्षित ओलिताची सोय , वाणाचा परिपक्वता कालावधी व मर व वांझ रोगाचा होणारा प्रादुर्भाव या सर्व बाबी लक्षात घेऊन तुरीच्या वाणाची निवड करावी.

## जलद कंपोस्ट खत तयार करण्याचे तंत्रज्ञान

जर बायोडायनॅमिक तंत्रज्ञानाचा विचार केला तर हे मुख्यत्वेकरून भारतीय वेदांवर आधारीत जैवऊर्जा म्हणजेच बायोडायनॅमिक तंत्र होय. या तंत्रात ब्रम्हांडातील ग्रह तारे यांचा पृथ्वी वनस्पती आणि जलचरावर होणारा सकारात्मक परिणामांचा अभ्यास आणि विचार केला जातो. या तंत्रज्ञानाचे वैशिष्ट्य म्हणजे या तंत्रज्ञानाच्या मदतीने कुठल्याही रासायनिक खतांचा किंवा इतर रासायनिक गोष्टींचा कुठल्याही पद्धतीचा वापर न करता कमी वेळेत उत्तम दर्जाचे कंपोस्ट या तंत्रज्ञानात तयार करता येते.

या तंत्रज्ञानात प्रत्येकी अन्नघटकांचा जसं की नत्र, स्फुरद,पालाश इत्यादींचा वेगवेगळा विचार करण्याऐवजी सगळे अन्नद्रव्यांचा एकत्रित विचार केला जातो. शेणखत हे शेतीसाठी फार उपयुक्त आहे. परंतु सध्याच्या काळामध्ये जनावरांची संख्या आणि त्यांपासून शेणखताची उपलब्धता फार कमी झाली आहे. आणि जे काही उपलब्ध आहे ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे म्हणजेच त्यामध्ये गवऱ्या, तणाच्या बिया किंवा प्लास्टिक मिसळूनते एवढे उपयुक्त राहत नाही. परंतु बायोडायनॅमिक तंत्रज्ञानाने मूग उडीद आणि सोयाबीन यासारख्या कडधान्याच्या उपलब्ध काडाचे उपयोग कंपोस्ट तयार करण्यासाठी केला पाहिजे. अशा प्रकारचे कंपोस्ट हे बायोडायनॅमिक पद्धतीने कमी खर्चात आणि वेगाने करणे शक्य होते.

बायोडायनॅमिक कंपोस्टसाठी पूर्वतयारी : १) या पद्धतीमध्ये पीक अवशेषांचे थरावर थर रचले जातात. त्यापासून साधारणत: दोन अडीच महिन्यात कंपोस्ट तयार होते. जर या पद्धतीमध्ये थोडी पूर्वतयारी केल्यास वेळेची चांगल्याप्रकारे बचत होते. २) ज्या पिकांचे कंपोस्ट खत तयार करण्यासाठी थर द्यायचे आहेत अशा पिकांचे अवशेष चार-पाच दिवस पुरेसे ओले करावेत. जेणेकरून



ते नरम होऊनजिवाणूंना काम करणे सोपे होते. यामध्ये प्रामुख्याने सोयाबीनची काड, मुग, उडदाच्या शेंगांची टरफले त्वरित कंपोस्टसाठी वापरता येतात.ते चांगल्या प्रकारे व पूर्णपणे कुजतात. ३) त्याअगोदर एक बैलगाडी ओले शेन जमा करून ठेवावे. ४) कोणत्याही वनस्पती चा हिरवा पाला दोन बैल गाडा इतका जमा करून ठेवावा. ५) यामधील एक ढिगासाठी एक किलो बायोडायनॅमिक एस ९ हे विरजण स्वरूपात लागते. ६) यामध्ये कंपोस्ट तयार करण्यासाठी खड्डा खोदण्याची गरज नसते. शेतावरील उंचावरील सपाट जागा निवडून, पूर्व पश्चिम दिशेने पंधरा फूट लांब आणि पाच फूट रुंद अशी जागा आखून घ्यावी. त्या जागेवर पाणी शिंपडून चांगले ओले करावे. अगोदर शेणकाला तयार करून ठेवा एक किलो बायो डायनॅमिक एस ९ ही तेरा लिटर पाण्यात एक तासभर उलट सुलट पद्धतीने घोळून तयार करून ठेवावे. जशी आपली गरज असेल त्यानुसार ते जातीच्या पाण्यात टाकुन वाढविता येते.

थर कसे असावेत : पहिला थर अगोदर पुरेसे ओले केलेल्या पीक अवशेषांचा एक फूट उंचीचा असावा. त्यावर एस ९ द्रावण शिंपडून त्यावर पुरेसा शेन काला टाकावा. त्यानंतर या झाडावर हिरव्या झाडाचा पाला एक फूट उंचीपर्यंत पसरवून त्यावर एस ९ द्रावण शिंपडावे. शेनकाला टाकून शेतातील दोन घमेली माती पसरावी.अशा पद्धतीने पहिला थर तयार होतो. अशा पद्धतीने पाच फूट उंचीपर्यंत एकावर एक थर रचावेत. नंतर शेनकाला व माती मिसळून आणि उपलब्ध असल्यास गव्हांडा टाकून तयार केलेले मिश्रण हे ढीग पूर्णपणे जमिनीपर्यंत लिंपून घ्यावा.उकरी करणे : एक महिन्यानंतर या ढिगाचा आकार लहान होतो. त्या वेळी पूर्ण ढीग फावड्याने उकरून सर मिसळ करून घ्यावे. त्यावर पुरेसे पाणी टाकून ओले करून पुन्हा शेनकाल्याने लिंपून टाकावे. यावेळी एस ९ टाकण्याची गरज नाही. अशा पद्धतीने एकूण साठ-सत्तर दिवसात दर्जेदार कंपोस्ट खत तयार होते. यामध्ये सर्व पीक अवशेषांचे कंपोस्ट तयार झालेले असते. जे पदार्थ नुसते शेणखतामध्ये कुजण्यासाठी आठ ते नऊ महिने लागतात.

या तंत्रज्ञानाच्या कंपोस्ट खताचे फायदे : १) पंधरा फूट लांब व पाच फूट रुंद आकाराच्या ढिगातून साधारणात: दहा गंठण पूर्णपणे कुजलेले कुजलेले कंपोस्ट खत मिळते. मूग, उडीद शेंगांची टरफले सूर्यफुलाची काड इत्यादींची जाळून विल्हेवाट लावली जाते. त्याऐवजी त्यांचे कंपोस्ट केल्यास जमिनीमध्ये सेंद्रिय कर्ब वाढून जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होते. २) बायोडायनॅमिक कंपोस्ट ढिगातून साधारणत: पिकांसाठी १८ ते २० किलो नत्र, उपलब्ध स्फुरद १८ ते २० किलो, पालाश दहा किलोपर्यंत मिळते. याबरोबरच गंध झिंक,कॅल्शियम, मॅग्नेशियम, अनिल लोह इत्यादी सूक्ष्म अन्नद्रव्ये ही मिळतात. ३) बायोडायनॅमिक हे कंपोस्ट पिकाच्या आवश्यकतेनुसार नायट्रोजन कंपोस्ट फास्फोरस, कंपोस्ट पोटॅश, कंपोस्ट आणि सल्फर कंपोस्ट असे म्हणतात. ४) या तंत्रज्ञाने कंपोस्ट तयार करण्यासाठी खड्डा खोदण्याची गरज नसल्याने सावली करतात. शेड उभारण्याचा खर्च येत नाही किंवा दररोज पाणी देणे व देखभालीची गरज सुद्धा येत नाही. ५) पूर्वतयारी केली असल्यास दोन मजूर एका दिवसात दोन ढीग बनवू शकतात. ६) पूर्णपणे तयार झालेल्या कंपोस्ट ढिगाखाली बऱ्याच वेळा शेतातील गांडूळ जमा झालेली दिसून येतात. जमिनीमधील जीवाणू व गांडुळांना संक्रिय करण्यास बायोडायनॅमिक कंपोस्ट मोलाचे कार्य करते. ७) एका ढिगातून साधारणत: दहा क्किंटल म्हणजेच ५० किलो वजनाची सुमारे २० पोती सेंद्रिय खत घरीच तयार होऊ शकते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६९३ : लंडनमध्ये पहिले महिला मासिक द लेडीज मर्क्युरी प्रकाशित केले गेले.
१९५० : अमेरिकेने कोरियन युद्धात आपले सैन्य पाठवण्याचा निर्णय घेतला.
१९५४ : अणुशक्तीवर चालणारे जगातील पहिले विद्युतकेंद्र (क्षमता: ५००० किलो वॅट) रशियातील मॉस्कोजवळ ओबनिन्स्क येथे सुरू झाले.
१९६४ : साली दिल्ली येथील तीन मूर्तिच्या भवनामध्ये भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचे संग्रहालय बनवण्याचा निर्णय घेण्यात आला.
१९६७ : लंडनजवळ एन्फिल्ड येथे जगातील पहिले ए.टी.एम. सुरू.
१९७७ : जिबुटी ला (फ्रान्सपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९९१ : युगोस्लाव्हियाने स्लोव्हेनियावर आक्रमण केले.
१९९६ : अर्थतज्ञ द. रा. पेंडसे यांना 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज'चा 'चिंतामणराव देशमुख पुरस्कार' जाहीर
१९८१ : कंबोडियाने संविधान स्वीकारले.
२००२ : परमाणु शस्त्र नष्ट करण्याच्या रशियाच्या योजनेस जी-८ देशांनी आपली सहमती दर्शविली.
२००८ : साली मायक्रोसॉफ्ट कॉर्पोरेशनचे अध्यक्ष बिल गेट्स यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.
२०१५ : साली संयुक्त राष्ट्र संघाने भारतीय चित्रपटाच्या इतिहासात विशेष स्थान असणार्या सत्यजित रे यांचे चित्र प्रदर्शित करण्याचा निर्णय घेतला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४६२ : लुई (बारावा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: १ जानेवारी १५१५)
१५५० : चार्ल्स (नववा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: ३० मे १५७४)
१८३८ : बंकिमचंद्र चट्टोपाध्याय बंगाली कादंबरीकार, कवी, लेखक आणि पत्रकार. त्यांनी लिहिलेल्या 'आनंदमठ' या कादंबरीत 'वंदे मातरम' हे गीत असून या गीताने स्वातंत्र्यलढ्यातील सहभागींना प्रेरणा मिळाली. (मृत्यू: ८ एप्रिल १८९४)
१८६४ : शिवराम महादेव परांजपे 'काळ' कर्ते, विद्वान, वक्ते, लेखक, स्वातंत्र्यसैनिक व पत्रकार (मृत्यू: २७ सप्टेंबर १९२९)
१८६९ : नोबेल पारितोषिक विजेते जर्मन प्राणीशास्त्रज्ञ हॅन्स स्पेमन यांचा जन्म.
१८७५ : दत्तात्रेय कोंडो घाटे ऊर्फ 'कवी दत्त' (मृत्यू: १३ मार्च १८९९)
१८८० : हेलन केलर अंध व मूकबधीर असुनही कला शाखेची पदवी मिळवलेल्या पहिल्या व्यक्ती, समाजसेविका, राजकीय कार्यकर्त्या व शिक्षिका (मृत्यू: १ जून १९६८)
१८९९ : पॅन अमेरिकन वर्ल्ड एअरवेज चे स्थापक जुआन पेप्पे यांचा जन्म. (मृत्यू: ३ एप्रिल १९८१)
१९१७ : खंडेराव मोरेश्वर ऊर्फ 'खंडू' रांगणेकर आक्रमक डावखुरे फलंदाज (मृत्यू: ११ आक्टोबर १९८४)
१९२२ : ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय तामिळ भाषिक लेखक, कादंबरीकार, लघुकथा लेखक, पत्रकार, व्यंगचित्रकार, प्रवासी लेखक, नाटककार आणि पटकथा लेखक अकिलन यांचा जन्मदिन.
१९३९ : राहूलदेव बर्मन तथा 'पंचमदा' संगीतकार (मृत्यू: ४ जानेवारी १९९४)
१९६२ : भारतीय-कॅनडातील उद्योगपती सुनंदा पुष्कर यांचा जन्म. (मृत्यू: १७ जानेवारी २०१४)
१९६४: साली पद्मश्री आणि अर्जुन पुरस्कार प्राप्त उत्कृष्ट सेवानिवृत्त भारतीय धावपटू पी. टी. उषा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७०८ : धनाजी जाधव मराठा साम्राज्यातील सेनापती (जन्म: १६५०)
१८३९ : महाराजा रणजितसिंग शिख साम्राज्याचे संस्थापक (जन्म: १३ नोव्हेंबर १७८०)
१९५७ : हर्मन बुहल फ्रिट्झ विंटरस्टेलर, मार्कस श्मक, कर्ट डिमबर्गर यांच्या सोबत ब्रॉड शिखर पहिल्यांदा चढणारे ऑस्टीयन गिर्यारोहक (जन्म: २१ सप्टेंबर १९२४)
१९९६ : अल्बर्ट आर. ब्रोकोली 'जेम्स बॉंड' पटांचे निर्माते (जन्म: ५ एप्रिल १९०९)
१९९८ : होमी जे. एच. तल्यारखान गांधीवादी नेते, सिक्कीमचे पहिले राज्यपाल, मंत्री व आमदार (जन्म: ९ फेब्रुवारी १९१७)
२००० : द. न. गोखले शिक्षणतज्ञ व चरित्रकार (जन्म: )
२००२ : भारतीय उपराष्ट्रपती कृष्णकांत यांचे निधन.
२००८ : फील्ड मार्शल सॅम माणेकशा (जन्म: ३ एप्रिल १९१४)

## सूक्ष्म सिंचनासाठी अनुदान प्रक्रिया

राज्यातील शेतकऱ्यांसाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत राबवण्यात येणारी ‘‘प्रति थेंब अधिक पीक‘‘ ही सूक्ष्म सिंचन योजना आता अधिक प्रभावी आणि शेतकऱ्यांसाठी अत्यंत फायदेशीर ठरत आहे. उत्पादन वाढवण्यासाठी पाण्याचा प्रभावी वापर करणाऱ्या या योजनेमुळे आता शेतकऱ्यांना मिळणार आहे ९०% पर्यंत थेट खात्यात अनुदान.या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे ‘‘प्रति थेंब अधिक पीक‘‘ हा तत्त्वज्ञान वापरून पाण्याची बचत करणे, उत्पादन वाढवणे आणि खर्च कमी करणे. मात्र फक्त ५ हेक्टरपर्यंत जमीन असलेल्या शेतकऱ्यांसाठी ही सुवर्णसंधी आहे. ही योजना शेतकऱ्यांना पाण्याचा कार्यक्षम वापर, खर्च कमी आणि उत्पादन वाढ यासाठी मदत करते. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी ही संधी नक्कीच साधावी.

योजनेची वैशिष्ट्ये :२५% ते ९०% पर्यंत अनुदान. एस-एसी प्रवर्गासाठी ९०% अनुदान. भूधारक शेतकऱ्यांना ५५%, बहुभूधारकांना ४५% अनुदान.

पूरक योजना :मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजना (२५% ते ३०% पूरक अनुदान). अनुसूचित जातीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना. अनुसूचित जमातीसाठी बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना.

अर्ज करण्याची प्रक्रिया :अर्ज महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन करावा लागतो. निवड संगणकीकृत लॉटरी पद्धतीने केली जाते. निवड झालेल्या शेतकऱ्यांना एसएमएस द्वारे सूचना मिळते. नंतर अधिकृत वितरकाकडून संच खरेदी करावा लागतो.

cmyk




राज्य लोकतंत्र
# मराठवाडा वृत्तांत

शुक्रवार दि. २६ जून २०२६ ५




# वाळूतस्करांवर कारवाई होते, मग ४२ कोटींच्या बोगस वृक्षलागवडीची चौकशी का नाही?

### आ. विजयसिंह पंडितांनी वनविभागाच्या भ्रष्टाचार प्रकरणाचा पाठपुरावा करावा : डॉ. गणेश ढवळे

बीड। प्रतिनिधी

गोदावरी पट्ट्यातील वाळू तस्करी प्रकरणात महसूल व पोलीस प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांवर चौकशी होऊन कारवाई होत आहे. मात्र बीड जिल्ह्यात वनविभागातील वनीकरण कामे आणि कागदोपत्री दाखविण्यात आलेल्या वृक्षलागवड प्रकरणाची साधी चौकशीही होत नसल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे. आमदार विजय सिंह पंडित यांच्या तक्रारीनंतर वाळू तस्करीवर कारवाई झाली, त्याच धर्तीवर वनविभागातील ४२ कोटी रुपयांच्या कथित बोगस वृक्षलागवड प्रकरणाचा पाठपुरावा करावा, अशी मागणी डॉ. ढवळे यांनी आ. विजय सिंह पंडित यांच्याकडे केली आहे. याबाबत त्यांनी वनमंत्री गणेश नाईक, वन विभागाचे सचिव, मंत्रालय मुंबई तसेच जिल्हाधिकारी बीड यांना निवेदन दिले आहे.

बीड जिल्ह्यातील वनविभाग आणि सामाजिक वनीकरण विभागात मोठ्या



प्रमाणावर अनागोंदी कारभार सुरू असून शासन निधीचा अपव्यय होत असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. हरित महाराष्ट्र अभियानांतर्गत ७ ऑगस्ट २०२५ रोजी नियम डावलून वृक्षलागवड करण्यात आली असून केवळ रेकॉर्ड करण्यासाठी केलेल्या या कामामुळे शासनाच्या कोट्यवधी रुपयांचा निधी वाया गेल्याचा दावा करण्यात आला आहे. निवेदनात वृक्षलागवड नियोजनातील त्रुटी, निकृष्ट रोपांची लागवड, रोपवनाच्या वेळापत्रकाकडे दुर्लक्ष, निधी वितरणातील असमतोल, कंत्राटदारांशी संगनमत, तसेच साहित्य खरेदी प्रक्रियेतील अनियमिततेची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. फायर ब्लोअर, ड्रोन, जीपीएस मशीन आदी साहित्य खरेदी करताना शासन नियमांचे पालन झाले नसल्याचा आरोप करत मागील तीन वर्षांत वनविभाग व सामाजिक वनीकरण विभागाने केलेल्या कामांचे स्वतंत्र मूल्यांकन करण्याची मागणी करण्यात आली आहे.

''वाळू तस्करीप्रकरणी लोकप्रतिनिधींच्या तक्रारीनंतर प्रशासन हलते, मात्र वनविभागातील गंभीर प्रकरणाकडे दुर्लक्ष केले जाते. जर आमदारांच्या तक्रारीनंतरही चौकशी होत नसेल तर सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींचे काय?'' असा सवाल डॉ. गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे. सदर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी अधिकारी, कर्मचारी व संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा डॉ. गणेश ढवळे यांनी दिला आहे.

## ऊसतोडीचे पैसेच्या वादातून महिलेला बेदाम मारहाण

### गुन्हा दाखल करण्याची मागणी



अंबड। प्रतिनिधी

ऊस तोडीच्या पैशाच्या वादातून घरी येऊन जबर मारहान करुन जिवे मारण्याच्या धमक्या देऊन व माझे गळयातील मंगलसुत्र व पोत तोडून नेली आहे. अशी तक्रार कविता एकनाथ चव्हाण या महिलेने उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्याकडे चौकशी करून गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

माझे पती एकनाथ तुळशीराम चव्हाण हे समर्थ सहकारी साखर कारखाना अंकुशनगर कडे मुकादमाचे काम करत होते त्यांनी रामकृष्ण तात्याबा ढाकणे यांचेकडून १० लाख रुपये घेतले होते काही दिवसांनी टोळी पळून गेली होती नंतर ढाकणे यांना माझे पतीने ६ लाखरुपये दिले माझे पती टोळी वाल्याकडे पैसे वसुल करण्यास गेले असता ते घरी नसतांना माझ्या घरी येऊन मला शिवदास दगडु चव्हाण, सचिन शिवदास चव्हाण, विमल शिवदास चव्हाण सर्व रा. रामनगर तांडा यांनी तुम्ही त्यांचे पैसे का देत नाही म्हणून वरील सर्वांनी मला मिळून जबर मारहान केली व कविताच्या गळयातील पोत मंगळसुत्र इ. वस्तु तोडून घेतल्या त्यामुळे माझ्या गळ्याला मानेला जखम झाली आहे. मी पाच दिवस सरकारी दवाखान्यात ॲडमिट होते माझे तब्बेत आणखीन सुध्दा बरी नाही व वरील लोका पासून मला व माझे कुटुंबाला जिवितास धोका आहे. सदरील प्रकरणी पोलिसांनी तत्काळ कारवाई करावी अशी मागणी उपविभागी पोलीस अधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे.

## राजस्थानी समाजातर्फे श्री महेश नवमी उत्सव भक्तिमय वातावरणात



मंठा। प्रतिनिधी

भगवान श्री महेश यांच्या जयघोषात व पारंपारिक वेशभूषेत मंठा येथील राजस्थानी समाजाच्या वतीने भगवान श्री महेश यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. श्री महेश निमित्त सकाळी मार्केट कमिटी परिसरातून निघालेल्या शोभायात्रेत आकर्षक पद्धतीने सजविण्यात आलेल्या रथावर भगवान श्री महेश यांची प्रतिमा विराजमान करण्यात आली होती. गुलाबी साड्यांमध्ये सजलेल्या महिला आणि पांढऱ्या शुभ्र पारंपरिक वेशातील पुरुष यांमुळे शोभायात्रेची शोभा अधिक खुलून दिसत होती.

रथाच्या अग्रभागी महिलांनी डोक्यावर मंगल कलश धारण करून सहभाग नोंदविला. ''जय महेश... जय महेश...'' या भक्तिमय घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. ही शोभायात्रा मुख्य मार्गाने श्री लक्ष्मीनारायण मंदिरात पोहोचली. मंदिरात भगवान श्री महेश यांचे पूजन करण्यात आले. यावेळी महेश नवमीचे धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व विशद करण्यात आले. सामूहिक आरती करून भक्तांनी भगवान महेश यांच्याप्रती आपली श्रद्धा व्यक्त केली. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व होतकरू प्रतिभावंतांचा आकर्षक भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. सायंकाळी आयोजित महाप्रसादाने उत्सवाची सांगता झाली.

संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजस्थानी महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ शितल शरद मुरक्या तसेच सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी माहेश्वरी समाजाचे तालुकाध्यक्ष राजेश मणियार, समाजातील पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक, महिला भगिनी तसेच युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात युवा वर्गानेही मोलाचे योगदान देत सामाजिक एकात्मता आणि धार्मिक संस्कारांची सुंदर परंपरा जपली.

## शिर्डीतील रेल्वेस्थानकाचा ६० कोटींतून कायापालट

### सिंहस्थ कुंभमेळ्याची चाहूल, दोन नवीन फलाट व पाच स्टेबलिंग लाइन उभारणार

शिर्डी । प्रतिनिधी

आगामी नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, रेल्वे प्रशासनाने शिर्डी (साईनगर) रेल्वेस्थानकाच्या विस्ताराची महत्त्वाकांक्षी योजना हाती घेतली आहे. कुंभमेळ्यासाठी देश-विदेशातून येणारे लाखो भाविक साई दर्शनासाठी शिर्डीत येतात. ही संभाव्य गर्दी लक्षात घेऊन सुमारे ६० कोटी रुपये खर्चून स्थानकावर दोन नवीन फलाट आणि पाच स्टेबलिंग लाइन उभारण्यात येणार आहेत.सध्या शिर्डी स्थानकावर तीन फलाट कार्यरत आहेत. नव्या योजनेअंतर्गत चार आणि पाच क्रमांकाचे दोन आधुनिक आयलँड फलाट उभारले जातील. तसेच रेल्वे गाड्यांच्या पार्किंग आणि देखभालीसाठी पाच नवीन स्टेबलिंग लाइन तयार करण्यात येणार आहेत. यामुळे एकाच वेळी अधिक गाड्या हाताळणे शक्य होईल आणि रेल्वे वाहतुकीवरील ताण कमी होईल.

साईनगर शिर्डी स्थानकावरून सध्या दररोज चार रेल्वेगाड्या सुटतात. विस्तार प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर नवीन गाड्या सुरू करण्यास मोठी मदत होणार असून, देशभरातून शिर्डीसाठी रेल्वे कनेक्टिव्हिटी मजबूत होईल. रेल्वे प्रशासनाने या प्रकल्पाचे काम डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यामुळे शिर्डी रेल्वेस्थानक हे उत्तर महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे आणि आधुनिक रेल्वे केंद्र म्हणून विकसित होणार आहे. ६० कोटींचा खर्च: प्रकल्पासाठी रेल्वे प्रशासनाकडून भरीव निधीची तरतूद. क्षमता वाढणार: सध्याच्या ३ फलाटांवरून आता ५ फलाट होणार; एकाच वेळी अधिक गाड्यांचे नियोजन शक्य. कनेक्टिव्हिटी वाढणार: प्रकल्प पूर्ण झाल्यावर देशभरातून शिर्डीसाठी नव्या रेल्वे गाड्या सुरू होणार. शिर्डी स्थानकातून वर्षाला ६ लाखांवर भाविकांचा प्रवास शिर्डी स्थानकातून दरवर्षी ६ लाखांहून अधिक साईभक्त प्रवास करतात. यातून रेल्वे प्रशासनाच्या तिजोरीत सुमारे २० कोटी रुपयांचे वार्षिक उत्पन्न जमा होते. सध्या शिर्डीहून आंध्र प्रदेश, तेलंगणा, तामिळनाडू, कर्नाटक, ओडिशा, पश्चिम बंगाल, पंजाब आणि हिमाचल प्रदेश या राज्यांसह मुंबई, नवी दिल्ली, भोपाळ, झांशी, भुवनेश्वर आदी शहरांसाठी थेट रेल्वे सेवा उपलब्ध आहे. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन रेल्वेने सुविधा वाढविण्याचे नियोजन सुरू केले आहे. सिंहस्थ काळात उपलब्ध रेल्वे सेवा दुपटीने वाढविण्याची तयारी करण्यात येत आहे.

## श्रीमंतराव कोल्हे यांचे दु:खद निधन

अंबड /प्रतिनिधी



अंबड तालुक्यातील पांगरखेडा श्रीमंतराव आप्पाराव कोल्हे यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले त्याच्यावर अंत्यसंस्कार दुपारी १ वाजता शेतात करण्यात आला त्याच्या पश्चात पत्नी दोन मुले दोन मुली जावई नांतवंडे असा मोठा परिवार आहे नामदेव कोल्हे यांचे वडील होत

## जरंडी परिसरामध्ये ढगफुटीसदृश पाऊस:सकाळी ७ ते ९ वाजेपर्यंत सोयगाव-बनोटी-चाळीसगाव राज्य मार्गावरील वाहतुकीवर परिणाम

सोयगाव। प्रतिनिधी

तालुक्यातील जरंडीसह परिसरात बुधवारी सकाळी ७ ते ९ या वेळेत झालेल्या ढगफुटीसदृश पावसाने हाहाकार उडवला. दोन तासांत कोसळलेल्या पावसामुळे गावालगत असलेल्या खडकी नदीला सकाळी अकरा वाजेच्या सुमारास पहिलाच मोठा पूर आला. पुराच्या पाण्याचा वेग अधिक असल्याने सोयगाव-चाळीसगाव राज्य मार्गावरील पूल वाहून गेला. परिणामी, या मार्गावरील वाहतूक ५ तास ठप्प झाली होती. सोयगाव-चाळीसगावचा संपर्क पूर्णपणे तुटला आहे. सध्या जरंडी परिसरात रस्त्याचे दुतर्फा सिमेंटीकरण युद्धपातळीवर सुरू आहे. मात्र, संबंधित ठेकेदाराने रस्त्यावरील नाल्यांचे पाणी वाहून जाण्यासाठी योग्य व्यवस्था केली नाही. तात्पुरते वळण रस्तेही पक्के केले नव्हते. त्यामुळे पाऊस सुरू होताच जरंडी ते सोयगावदरम्यानचे बहुतांश वळण रस्ते पाण्यात वाहून गेले. ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे वाहनधारकांना त्रास सहन करावा लागत असल्याचा संताप व्यक्त होत आहे. जरंडी शिवारात झालेल्या या ढगफुटीसदृश पावसाने संपूर्ण शेतजमीन जलमय झाली आहे.

सिल्लोड : भराडी-घाटनांद्रा रस्त्यावरील वाहतूक जोरदार पावसामुळे २ तास ठप्प सिल्लोड तालुक्यातील भराडी मंडळात मंगळवारी पावसाने कहर केला. कासोद आणि तळणी येथील नाल्यांना मोठा पूर आल्यामुळे भराडी-घाटनांद्रा रस्त्यावरील वाहतूक तब्बल दोन तास ठप्प झाली होती. या मंडळात कासोद, तळणी, वडोदचा था, वांगी, भराडी, सीसारखेडा, धामणी या गावांमध्ये धुवांधार पाऊस झाल्याने शेतकऱ्यांची मोठी तारांबळ उडाली. भराडी नदीच्या पुराचे पाणी अनेक शेतकऱ्यांच्या शेतात शिरल्याने मोठे नुकसान झाले आहे. अनेक जणांच्या शेतात अंथरलेले ठिबक सिंचनाचे पाईप व संच पुराच्या पाण्यात वाहून गेले आहेत. फुलंब्री : पावसाअभावी खरीप पेरण्या खोळंबल्या फुलंब्री तालुक्याला वरुणराजाने हुलकावणी दिली आहे. गेले काही दिवस केवळ ढगाळ वातावरण निर्माण होत असल्याने शेतकऱ्यांची निराशा होत आहे. खरिपाच्या पेरण्या पूर्णपणे खोळंबल्या आहेत. काही शेतकऱ्यांनी मान्सूनच्या आशेवर धूळपेरणी केली. काहींनी विहिरीच्या पाण्यावर ठिबक सिंचनाद्वारे कपाशीची लागवड केली. मात्र, पावसाने ओढ दिल्यामुळे विहिरींची पाणीपातळी खालावली आहे. कपाशीसह इतर पिके आता करपू लागली आहेत. शेतकरी चातकासारखा मोठ्या पावसाची प्रतीक्षा करत आहे. कन्नड : रिमझिम पाऊस; १९ मिलिमीटरची नोंद एक महिन्याच्या खंडानंतर कन्नड शहर व तालुक्यात मंगळवार आणि बुधवारी रिमझिम पावसाने हजेरी लावली. तालुक्यात १९ मिमी. पावसाची नोंद झाली आहे. यामुळे वातावरणात गारवा पसरला. शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. तालुक्यात १ लाख हेक्टरवर खरिपाची तयारी पूर्ण आहे. पावसाचा जोर कमी असला तरी तो सर्वदूर आहे. मात्र, किमान ६५ मिमी. पाऊस झाल्याशिवाय शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी संदीप शिरसाट यांनी केले आहे. एक महिन्यानंतर पावसाने हजेरी लावली आहे.

## हस्तीमल बंब यांना महाराष्ट्र शासनातर्फे मुंबई येथे राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार प्रदान

जालना । प्रतिनिधी

उद्योग मंत्रालय महाराष्ट्र शासना तर्फे लहान-सहान, मध्यम, सुक्ष्म, लघु उद्योग व्यवसायातील गरजू महिला व तरुणासाठी राबविण्यात आलेली योजना अनुदान कर्ज या अभियाना अंतर्गत दि. २३ जून २०२६ रोजी मुंबई येथील स्टॉक एक्सचेंजच्या भव्य सभागृहात राज्यस्तरीय उद्योजक व्यापारी मेळाव्यात संपुर्ण महाराष्ट्रातील जिल्हावार ३२ पुरस्कार देण्यात आले. त्यात राज्यात सर्वात उत्कृष्ट कार्या बद्दल जालना जिल्ह्याध्यक्ष हस्तीमलजी बंब यांची प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला. हे जालना जिल्ह्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. यावेळी मंचावर राज्यसभा सदस्य नवी दिल्ली डॉ. ज्योती वाघमारे, उद्योग मंत्रालयातील या योजनाचे राज्य समन्वयक व झेप उद्योगिनीचे संस्थापिका सौ. पोर्णिमा शिरीषकर, सहाय्यक संचालक हस्तकला वस्त्रोद्योग मंत्रालय, भारत सरकारचे श्री सुरेश तांडेकर ई. मान्यवर उपस्थित होते. श्री बंब संपूर्ण जालना जिल्ह्यात सर्व तालुका अंतर्गत ग्रामीण भागात वारंवार संपर्क दौरे करून गरजू महिलांना एकजुट संघटीत करुन





जिल्हास्तरीय, गांवस्तरीय महिलांना व्यापारी महासंघात आरक्षण देऊन जिल्यात उद्योग व्यवसाय करणारी इच्छुक महिलांची जवळपास ४० गावात महिला आघाडीची संघटना उभारणारा राज्यात जालना जिला प्रथम आहे. गरजू महिला व तरुणांना शासकीय किंवा खासगी नौकरी मिळणे अवघड आहे. नौकरीच्या मागे न लगता स्वतःचा उद्योग उभारुण इतरांना व्यवसायात आणावे. शासनाची अनेक योजना अनुदान नाममात्र व्याजाने कर्ज मिळतात जरुरतमंदाना शासकीय योजनाचा लाभ मिळावा या साठी व्यापारी महासंघात महाराष्ट्रात प्रथमच जालना जिल्हयाच्या महिला अधिवेशन बंब यांच्या मार्गदर्शना खाली सौ. मोहिते, सौ. अय्यर, सौ. जोशी यांनी घेऊन योजनाचा लाभ मिळवा या साठी जिला ग्रामउद्योग अग्रणीय बँक व उद्योग मंत्रालय प्रतिनिधी सौ. शिरीषकर यांच्या उपस्थितीत भव्य अधिवेशन पार पाडला. योजनाच्या मंजूरीसाठी लागणारे आवश्यक उद्यम आधार कार्ड, प्रमाण पत्र कार्यशाळा घेऊन सर्व इच्छुक महिलाना देण्यात आले. अनेक महिलांचे प्रास्ताव दाखल करून अनेकांना मंजूरी कर्ज मिळाले आहे. मान्यवरांनी जालना पेर्टन कार्य राज्यात प्रत्येक जिल्ह्यात होणे गरजेचे आहे, असे सांगुन कौतुक व अभिनंदन केले. पुरस्कार-सत्काराचा उत्तर देतांना बंब म्हणाले गरजू महिलासाठी गांवो गावी महिलागृह उद्योग उभारु, हा पुरस्कार माझा एकटाचा नसून संघटनेत माझ्या सोबत काम करणारे सर्वाचे यात कष्ट आहे. सर्वांना सोबत घेऊन संपुर्ण जिल्ह्यात गांवो-गावी शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी तळा-गळा पर्यंत पोहचु, या वेळी श्री बंब सोबत त्यांची धर्मपत्नी सौ. पंचफुलादेवी बंब, सुपुत्र आनंद बंब, सुखदेव बजाज, ॲड. सुब्राह्मण्यम अय्यर, महिला आघाडीची सौ. आनंदी अय्यर, सुश्री अय्यर इ. उपस्थित होते. शासना तर्फे महाराष्ट्र राज्याचा प्रथम पुरस्कार हस्तीमलजी बंब यांना मिळाल्या बद्दल जिल्ह्यातुन व राज्यभरातुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## वाळू तस्कर समीर पठाण एक वर्षासाठी कारागृहात;गोंदी पोलिसाची कारवाई

जालना। प्रतिनिधी

शरिराविरुध्दच्या गुन्हयातील आरोपी वाळु तस्कर समीर महेबुब पठाण वय ३१ वर्षे रा. दुनगाव ता. अंबड जि.जालना याचेवर पोलीस ठाणे गोंदी येथे वाळु चोरी करणे, अवैध वाळु तस्करी करणे, जीवे मारण्याच्या धमक्या देणे, सार्वजनिक रस्त्यावर सामान्य लोकांना मारहाण करणेबाबतचे गुन्हे दाखल असुन इसमावर प्रतिबंधात्मक कारवाई करनही त्याचे वर्तनात काही एक फरक पडत नसल्याने समीर पठाण याचेवर महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकन्नाव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स), बाळु तरकर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विपाकत कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम १९८१ कलम ३(१) अन्वये स्थानबध्दता करण्याबाबत मा. वरीष्ठांच्या मार्फतीने प्रस्ताव पाठवला होता, त्यास मा. जिल्हादंडाधिकारी यांनी सदर प्रस्तावाला दिनांक ०२/०१/२०२६ रोजी मंजुरी दिली होती.

सदर स्थानबध्दतेचा आदेश दिल्यापासुन पोलीस ठाणे गोंदी अधिकारी व अंमलदार त्याचे मागावर होते परंतु सदरचा इसम हा सराईत असल्याने मिळुन येत नव्हता.

परंतु २४/०६/२०२६ रोजी पोलीस ठाणे गोंदी प्रभारी अधिकारी सपोनि अमोल गुरले व पथक यांनी सदर इसमाची गोपनिय खबरी मार्फत माहीती काढून त्यास वडीगोद्री येथुन ताब्यात घेण्यात आले. सदरची कारवाई मा. श्री तेगबीर सिंह संधु पोलीस अधिक्षक , मा. श्री विक्रम साळी, अपर पोलीस अधिक्षक , मा.श्री सिध्देश्वर धुमाळ उपविभागीय पोलीस अधिकारी अंबड, यांच्या मार्गदर्शनाखाली गोंदी पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी सपोनि अमोल गुरले, पोउपनि हारी जंगले, पो.शि १४ एस. के. सिद्दीकी, पो.शि १८१ जी.पी.भवरे, पो.शि ८०४ ज्योतीलाल राठोड यांनी केली असुन सदर स्थानबध्द इसमास मा. जिल्हादंडाधिकारी सो जालना यांनी दिलेल्या आदेशानुसार ०१ वर्षाकरीता मध्यवर्ती कारागृह, छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी दाखल करण्यात येत आहे.

दैनिक
राज्य लोकतंत्र



# दोन धोकादायक गुंडांची एमपीडीए अंतर्गत हर्सूल कारागृहात रवानगी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत आणि जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी कठोर पवित्रा घेतला आहे. जिल्हयातील गुन्हेगारी आणि वाळू माफियांवर अंकुश मिळवण्यासाठी प्रशासनाने (महाराष्ट्र झोपडपट्टी दादा, हातभट्टीवाले, औषधोपचार करणारे, धोकादायक व्यक्ती, व्हिडिओ किंवा ऑडिओ पायरेटर्सचे विळख्यात अडकलेले लोक) कायद्याचा बडगा उगारला असून, वडवणी आणि केज येथील दोन सराईत गुंडांना हर्सूल कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी सूत्रे हाती घेतल्यापासून गुन्हेगारी मोडीत काढण्याचे धोरण अवलंबले आहे. याच अनुषंगाने खालील दोन इसमांवर कारवाई करण्यात आली आहे:




साहील सुर्यकांत भोरे (वय २१, रा. वडवणी): याच्यावर वडवणी पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न, बलात्कार, अवैध शस्त्र बाळगणे आणि गंभीर दुखापत करण्यासह एकूण ०६ गंभीर गुन्हे दाखल आहेत. यापूर्वी प्रतिबंधक कारवाई करूनही वर्तनात सुधारणा न झाल्याने त्याला स्थानबद्ध करण्यात आले आहे. उमेर ऊर्फ पापा मुस्ताक फारोकी (वय ३०, रा. केज): याच्यावर केज पोलीस ठाण्यात मारहाण, चोरी, खंडणी, अवैध शस्त्र बाळगणे अशा गंभीर स्वरूपाचे १० गुन्हे दाखल आहेत. वारंवार प्रतिबंधक कारवाई करूनही सुधारणा न झाल्याने त्याच्यावर पुन्हा एकदा एमपीडिए अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. जिल्हादंडाधिकारी विवेक जॉन्सन यांनी २२ व २३ जून रोजी हे आदेश पारीत केले होते. त्यानंतर पोलीस पथकाने या दोन्ही गुंडांना ताब्यात घेऊन २४ जून रोजी हर्सूल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे रवाना केले. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी स्पष्ट केले आहे की, भविष्यातही वाळू माफियांवर, अवैध गुटका विक्री करणाऱ्यांवर, जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणाऱ्यांवर आणि जातीय सलोखा बिघडवणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाई केली जाईल.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहायक पोलीस अधीक्षक व्यंकटराम व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पार पाडली.

# तोहीद खान हत्या प्रकरणी सखोल तपास करण्याची पुढील आठवड्यात विधिमंडळात मागणी करणार-धनंजय मुंडे

मुंबई । प्रतिनिधी

परळीतील तोहीद खान हत्या प्रकरणी मी पुढील आठवड्यात विधिमंडळात सखोल चौकशी तसेच वाढत्या नशेखोरीबाबत कारवाई करण्याची मागणी करणार आहे. तोहीद खान यांच्या हत्या प्रकरणी दोन मुख्य आरोपी अटकेत असून या केसचा सर्व बाजूंनी वस्तुनिष्ठ तपास केला जावा, अशी मागणी विधिमंडळात करणार असल्याची माहिती माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी दिली आहे.



धनंजय मुंडे यांनी याबाबत सविस्तर फेसबुक पोस्ट करत माहिती दिली आहे. मयत तोहीद खान यांच्या कुटुंबियांची मी याआधी भेट घेतलेली असून त्यांना तात्पुरती आर्थिक मदत करत त्यांच्या तीनही मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली आहे. विलास घुले हत्या प्रकरणी आवाज उठवत असताना विलास यांचा अंत्यविधी बाकी होता, त्यामुळे तो विषय तातडीचा होता. पण विलास घुले व तोहीद खान प्रकरणी एकाच वेळी बोलल्यास अर्थात दोन वेगवेगळे विषय एकाच वेळी हाताळल्यास त्या विषयांचे महत्व कमी होऊ शकते, याची मला पूर्ण जाणीव आहे, असेही धनंजय मुंडे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

तोहीद खान या आमच्या भावाला न्याय मिळवून देण्यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करणार, किंबहुना मी ती माझी जबाबदारी समजतो, असे धनंजय मुंडे यांनी आपल्या पोस्टद्वारे स्पष्ट केले आहे. दरम्यान सदर घटना घडली तेव्हा धनंजय मुंडे हे वैद्यकीय कारणास्तव बाहेर होते. मात्र त्यांनी पोलिस अधिकाऱ्यांशी फोनवरून संवाद साधत आरोपींना तात्काळ अटक करण्यासंबंधी सूचना केल्या होत्या, तसेच परळीत परत येताच त्यांनी तोहीद यांच्या कुटुंबियांची भेट घेत सांत्वन केले आणि त्यांना नाथ प्रतिष्ठान मार्फत एक लाख रुपयांची तात्पुरती आर्थिक मदत केली होती. त्याचबरोबर तोहीद यांच्या तीनही मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली असल्याचे कुटुंबियांना अवगत करत, न्यायाच्या लढाईत आपण कायम सोबत असल्याचे कुटुंबियांना सांगितले होते.

# गेवराई पोलिसांची मोठी कारवाई: ६.६३ लाखांचा जुगार अड्डा उद्ध्वस्त

गेवराई । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली, गेवराई पोलिसांनी जुगारावर मोठी कारवाई करत १२ जणांना ताब्यात घेतले आहे. या कारवाईत रोख रकमेसह एकूण ६,६३,१००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अवैध धंद्यांवर कडक कारवाई करण्याच्या सूचनेनुसार, गेवराई पोलिसांच्या पथकाला गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, गेवराई ते ताकडगाव रोडवरील शिवनेरी मंगल कार्यालयाजवळील गायरान जमिनीवर काही इसम पत्यांवर



तिरट नावाचा जुगार खेळत व खेळवत आहेत. या माहितीच्या आधारे २४ जून २०२६ रोजी सायंकाळी ७:३५ च्या सुमारास पोलिसांनी छापा टाकला असता, १२ इसम रंगेहात जुगार खेळताना मिळून आले. सदर कारवाईत जुगाराचे साहित्य, रोख रक्कम, मोटार सायकली आणि मोबाईल असा एकूण ६,६३,१००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, सर्व १२ आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कामगिरी बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि गेवराईचे उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलीस निरीक्षक किशोर पवार, सपोनि समाधान दौड, पोउपनि रामराव खोत, पोउपनि सुरेश पारधी यांच्यासह गणेश घोलप, आरेफ बागवान, ऋषिकेश पोटे, विकास डरपे, नितीन नवले आणि गोरक्ष डोके या पथकाने या कारवाईत सहभाग घेतला.

# ग्रामपंचायत भवनाचा निधी परत मिळणार नाही असे सांगून कर्मचाऱ्याची बदनामी

## प्रामाणिक कर्मचाऱ्यांच्या पाठीशी सरपंच संघटना खंबीरपणे उभी- तळेकर

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियाना अंतर्गत ग्रामपंचायत इमारत भवनासाठी जिल्ह्यातील २८ ग्रामपंचायतींना निधी मंजूर करण्यात आला होता त्यातील पहिला हप्ता ७४ लाख रुपये विचारीत करण्यात आला. मात्र उर्वरित पंधरा लाख रुपये वेळेअभावी वितरित झाला नाही आणि परत गेला तो नंतर पुढच्या वर्षी परत येतो. मात्र काही लोकांनी हा निधी पुन्हा येणारच नाही अशी अफवा पसरवून या विभागाच्या संबंधित कर्मचाऱ्याला बदनाम करण्यासाठी तुमचा निधी जाणीवपूर्वक परत पाठवला असा



संभ्रम निर्माण केला. मात्र संबंधित ग्रामपंचायत सरपंचांनी या प्रमाणिक कर्मचाऱ्यांच्या पाठीशी उभे राहून त्याच्यावर कुठलीही कारवाई होऊ नये यासाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष भेटून पत्र दिले. ◀◀ पान ३ वर

### माझी सहकार्याची भूमिका- खरसाडे

जिल्ह्यातील ग्रामपंचायतच्या बांधकामासाठी सरपंच आणि उपसरपंच यांना मी नेहमी सहकार्य केले आहे. आपल्या जिल्ह्यातील कामे वेगाने व्हावे यासाठी मी स्वत: प्रयत्न केलेले आहेत. आनेक विभागाचे काम माझ्याकडे असतानाही ही कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी मी प्रयत्न करीत आहे. केवळ वैयक्तिक आकसापोटी प्रसार माध्यमांना चुकीची माहिती देऊन माझ्याबद्दल गैरसमज पसरवण्याचे काम काही मंडळी करीत आहेत. मात्र संबंधित ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच यांना याबद्दल आक्षेप नाही ही समाधानाची बाब आहे.

अशोक खरसाडे, जिल्हा व्यवस्थापक

# ना. पंकजाताई मुंडे यांनी मयत विलास घुलेंच्या परिवाराचे स्वीकारले पालकत्व

## गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने घुले कुटुंबास पाच लाखाची मदत जाहीर

बीड । प्रतिनिधी

टाकळी- कदमवाडी (ता. केज) परिसरात झालेल्या घटनेत दुर्दैवी मृत्यू झालेल्या विलास घुले यांच्या परिवाराचे पालकत्व स्वीकारत राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी त्यांना मदतीचा हात दिला आहे. मयत घुले यांच्या पत्नीस गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने पाच लाख रूपयांची मदत आज त्यांनी जाहीर केली आहे.

विलास घुले याच्या हत्येच्या प्रकरणात झालेल्या दुर्दैवी घटनेचा तीव्र निषेध करत ना. पंकजाताई मुंडे यांनी पोलिस प्रशासनाला दोषींवर कडक कारवाई करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत, पण कोवळ्या वयात काहीही संबंध नसताना त्याचा हकनाक मृत्यू झाल्यामुळे त्याचे कुटुंब उघड्यावर पडले असून त्यांचेवर अकाली संकट आले आहे. विलास यांचे बंधू रमेश यांच्याशी ना. पंकजाताईंनी संपर्क साधून आपण विलासच्या मृत्यूबद्दल दुःख व्यक्त केले. तुमच्या दुःखात आणि न्यायाच्या लढाईत मी परिवाराच्या पाठिशी ठामपणे उभी असल्याचे सांगितले. गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या माध्यमातून त्याच्या पत्नीला पाच लाखाची मदत देणार असून मी स्वतः डॉ.प्रितमताई मुंडे यांना चेक घेऊन तिथे पाठविणार असल्याचे ना. पंकजाताई मुंडे यांनी म्हटले आहे.



# जोरदार पाऊस पडल्याने पेरण्या सुरु

दिंद्रुड । प्रतिनिधी

या वर्षी सुरवातीला पाऊस आला नाही पण आत्ता पेरणी योग्य पाऊस पडला आल्याने दिंद्रुड तसेच परिसरातील गावात पेरणीला वेग आला आहे, कापुस लागवड करण्यासाठी मजुर प्रत्येक शेतकरी यांना भेटत नाही यामुळे आत्ता कापुस लागवड हि पेरणी यंत्राने करताना सर्वत्र दिसत आहेत, जवळा येथे दत्ता साबळे,व मुंजा साबळे हे शेतकरी दिसत आहे. यामुळे कापुस लागवड हि लवकर होते याने वेळेत पेरणी होते.

# जिल्हा परिषदेच्या बहुचर्चित ६५ सेवा जेष्ठ शिक्षकांना केंद्रप्रमुखपदी पदोन्नती

**बीड । प्रतिनिधी**

बहुचर्चित आणि अनेक दिवसापासून रेंगाळलेल्या बीड जिल्हा परिषदेतील ६५ सेवा जेष्ठ शिक्षकांना केंद्रप्रमुखपदी नियुक्ती देण्यात आले आहेत. सदर आदेश प्राप्त होताच बहुतांशी पदोन्नती मिळालेली बहुतांशी केंद्रप्रमुख आजच रुजू झाले आहेत.

यासंदर्भात माहिती अशी की, बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात १६४ केंद्रप्रमुख पदे मान्य आहे. सध्या पदोन्नतीची १२ सरळ सेवेचे ५ असे एकूण फक्त १६ पदाचे केंद्रप्रमुख कार्यरत आहेत. सेवा जेष्ठ शिक्षकातील पदोन्नतीने ६५ पदे भरण्यात आली. यामध्ये दिव्यांग उर्दूची तीन पदे सध्या उमेदवार न मिळाल्याने रिक्त आहेत. गेल्या दोन महिन्यापूर्वी तत्कालीन शिक्षणाधिकारी डॉ. किरण कुंवर यांच्याकडे प्रभारी पदभार असताना बीड जिल्हा परिषदेत सेवा जेष्ठ असलेल्या शिक्षकाकडून केंद्रप्रमुख पदासाठी सेवाजेष्ठ यादी तयार करण्यात आली आणि तात्काळ ६५ शिक्षकांना पदोन्नती देण्याची संपूर्ण कार्यवाही करण्यात आली. दरम्यान शिक्षक संघटनेच्या काहींनी न्यायालयात या प्रकरणी अक्षय घेतले होते. जिल्हा परिषदेकडून न्यायालयात या संदर्भातील यादी सादर करण्यात आली होती. बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांच्या मान्यतेसाठी सदर संचिका प्रस्तावित होती. मात्र या यादीवर आरोप प्रत्यारोप असताना रेंगाळलेल्या या यादीला बीड जिल्हा परिषदेने दिनांक २४ रोजी मान्यता देऊन आदेश निर्गमित केले. जिल्हा परिषद आहेत सरळ सेवेने ७८ मध्ये भरण्याची कारवाई करण्यात येणार आहे.

# पाटोदा पोलिसांकडून १४.८० लाखांचा गुटखा व प्रतिबंधित अन्नपदार्थ नष्ट

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या विविध गुन्ह्यांमधील जप्त करण्यात आलेला सुमारे १४ लाख ८० हजार १२३ रुपयांचा गुटखा व अन्य प्रतिबंधित अन्नपदार्थ न्यायालयाच्या आदेशानुसार नष्ट करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हा क्रमांक ३८५/२०२४, ४०/२०२५, २६३/२०२५ व २४३/२०२५ या चार गुन्ह्यांमध्ये जप्त करण्यात



आलेला गुटखा व प्रतिबंधित अन्नपदार्थाचा मुद्देमाल नष्ट करण्याबाबत मा. न्यायालय, पाटोदा यांनी आदेश दिले होते. त्यानुसार सदर कारवाई करण्यात आली. ही कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी अ. भ. गाढे, पोलीस निरीक्षक उमाशंकर कस्तुरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी पोलीस हवालदार नैराळे, पोलीस हवालदार कावळे, दोन पंच तसेच पत्रकार कोल्हे उपस्थित होते.

न्यायालयाच्या आदेशानुसार जप्त मुद्देमालाची नियमानुसार विल्हेवाट लावण्यात आली



असून, प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या विक्री व वाहतुकीविरोधात पोलीस व अन्न सुरक्षा विभागाची कारवाई यापुढेही सुरू राहणार असल्याचे सांगण्यात आले.

# कोयत्याने वार करून जबरी चोरी करणाऱ्या टोळीला बीड एलसीबीने ठोकल्या बेड्या

बीड । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात काही दिवसांपूर्वी झालेल्या जबरी चोरी आणि घरफोडीच्या गंभीर गुन्ह्यांचा स्थानिक गुन्हे शाखेने यशस्वी पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी इंदापूर (जि. पुणे) येथून तीन आरोपींना अटक केली असून, त्यांच्याकडून चोरीचा मुद्देमाल आणि गुन्ह्यात वापरलेला कोयता जप्त करण्यात आला आहे.

दिनांक २२ जून २०२६ रोजी राजेंद्र अभिमान नागरे (वय ४१, रा. थेरला) हे आपल्या मोटारसायकलवरून गावी जात



असताना, रोहतवाडी शिवारामध्ये तीन अनोळखी इसमांनी त्यांना अडवले. आरोपींनी त्यांना कोयत्याने वार करून गंभीर जखमी केले आणि त्यांच्याकडील मोबाईल व रोख रक्कम लुटली. याप्रकरणी पाटोदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, नागरे यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.

त्याच दिवशी, याच आरोपींनी थेरला फाटा येथील सिताबाई महादेव सोनवणे यांच्या घरी आणि संतकृपा हॉटेलमध्ये घरफोडी करून टीव्ही, मोबाईल व सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह सुमारे ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला होता. याप्रकरणी पाटोदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता. ◀◀ पान ३ वर

# बीडच्या शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ, हेक्टरी १७,५०० रुपयांच्या आश्वासनाचे काय झाले ?

## विधिमंडळाच्या अधिवेशनात बीडच्या पीक विम्याचा मुद्दा पेटणार; लोकप्रतिनिधींच्या भूमिकेकडे लक्ष

पाटोदा । प्रतिनिधी

एकीकडे पावसाने दडी मारल्यामुळे बीड जिल्ह्यातील शेतकरी भीषण दुष्काळाच्या उंबरठ्यावर उभे असताना, दुसरीकडे गतवर्षीच्या पीक विम्यापासून शेतकरी अजूनही वंचित आहेत. सरकारने बीडच्या शेतकऱ्यांची अक्षरशः वेड्यात काढल्याची भावना व्यक्त होत आहे. ''हेक्टरी १७,५०० रुपये देऊ'' असे आश्वासन देणाऱ्या महायुती सरकारचा खरा चेहरा आता समोर आला असून, बीड जिल्ह्याला पीक विम्यातून वगळल्याने शेतकरी आक्रमक झाले आहेत.

नेमका प्रकार काय?

गेल्या खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे बीड जिल्ह्यातील पिकांचे अतोनात नुकसान झाले होते. सरकारने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी हेक्टरी १७,५०० रुपये मदत देण्याचे जाहीर केले होते. मात्र, प्रत्यक्षात बीड जिल्ह्याला या योजनेतून वगळल्याने शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावला गेला आहे. विशेष म्हणजे, बीड जिल्ह्यातील एकाही लोकप्रतिनिधीने या गंभीर विषयावर सभागृहात किंवा सरकारदरबारी ठामपणे बाजू मांडली नाही, हे जिल्ह्याचे दुर्दैव आहे.

जूनपासून सुरू होणारे अधिवेशन ठरणार निर्णायक

जूनपासून विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू होत आहे. या अधिवेशनात बीडच्या प्रलंबित पीक विम्याचा मुद्दा मुख्य अजेंडा असावा, अशी मागणी जोर धरत आहे. हा केवळ आर्थिक प्रश्न नसून लाखो शेतकरी कुटुंबांच्या जगण्याचा प्रश्न आहे.

शेतकऱ्यांचा सवाल:

''सरकारने दिलेली आश्वासने हवेतच विरली आहेत का? फडणवीस साहेब, आपण दिलेले १७,५०० रुपयांचे आश्वासन कधी पूर्ण करणार?'' असा संतप्त सवाल बीडचा बळीराजा करत आहे. जर आताही लोकप्रतिनिधींनी पक्षभेद विसरून हा प्रश्न धसास लावला नाही, तर शेतकऱ्यांचा उद्रेक अटळ आहे.

१. बीड जिल्ह्याला तातडीने पीक विमा जाहीर करावा. २. जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींनी अधिवेशनात एकजुटीने सरकारवर दबाव आणावा. ३. विम्यापासून वंचित राहिलेल्या प्रत्येक शेतकऱ्याला न्याय मिळावा.

# भागवत ग्रंथ हा मानवी जीवनाला सन्मार्ग दाखवणारा अमूल्य ठेवा -ह.भ.प. भागवत महाराज बादाडे

आष्टी । प्रतिनिधी

भागवत ग्रंथ हा केवळ एक कथा नसून मानवी जीवनाला सन्मार्ग दाखवणारा आणि मनाची शुद्धी करणारा अमूल्य ठेवा आहे. मानवी जीवनात अन्न, मान आणि धन या गोष्टी प्रारब्धाने मिळतात, परंतु भगवंताची भक्ती आणि संतांचा सहवास हा केवळ भाग्यानेच लाभतो,'' असे प्रतिपादन संत वाङ्मयाचे थोर उपासक आणि ज्ञानेश्वरीकंठस्थ श्री ह.भ.प.भागवत महाराज बादाडे (बीड) यांनी केले. आष्टी शहरामध्ये महान संत ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर यांच्या २६ व्या. पुण्यतिथी निमित्त भव्य संगीत श्रीमद्? भागवत कथा, ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.या सप्ताहाच्या तिसऱ्या दिवशी कथेचे निरूपण करताना महाराज बोलत होते.




ओघवत्या वाणीने श्रोते मंत्रमुग्ध

माऊली मंदिराच्या पवित्र आणि प्रसन्न वातावरणामध्ये सुरू असलेल्या या संगीत भागवत कथेदरम्यान भागवत महाराज बादाडे आपल्या रसाळ आणि ओघवत्या वाणीने भाविकांना भक्तीरसात न्हाऊ घालत आहेत. त्यांनी श्रीमद्भागवतातील विविध प्रसंग आणि उदाहरणे देऊन सध्याच्या काळातील मानवी जीवन, नीतिमत्ता आणि भक्तीचे महत्त्व अतिशय सोप्या शब्दांत विशद केले. ग्रंथातील विविध दाखल्यांनी केलेल्या या अभ्यासपूर्ण निरूपणाने पंचक्रोशीतील भाविकांना मंत्रमुग्ध केले आहे.

राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

या सोहळ्याचे औचित्य साधून कथेला अनेक क्षेत्रांतील दिग्गज मान्यवरांनी हजेरी लावली होती. यामध्ये प्रामुख्याने: माजी आमदार साहेबराव दरेकर, ह.भ.प.श्रीहरी पुरी महाराज,विठ्ठल आण्णा बन्सोडे, राजेंद्र धोंडे ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26